# श्री साईलीला



१९८० ] गुरुपौर्णिमा विशेषांक [ किंमत १ रु.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५९ वे ] जुलै १९८० [ अं. ४

: संपादक :

श्री. क. हि. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. १०-०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक १ रु. फक्त.

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४-बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

## श्रीसाई वाक्सुधा

धन्य धन्य श्रीसाई समर्थ ।
ग्रंथरूपें स्वार्थ परमार्थ ।
बोधूनि भक्तां करी कृतार्थ ।
जो कृत कार्यार्थ संपादी ॥१॥

माथां पडतां जयाचा हात ।
करी जो तात्काळ शक्तिपात ।
अप्राप्य वस्तु करी प्राप्त ।
भेदाचा निःपात करूनि ॥२॥

विरवूनि मी तूंभाव भिन्न ।
जया करितां साष्टांग नमन ।
हृदयी धरी आलिंगून ।
अनन्य शरण रिघतांचि ॥३॥

नामें भिन्न सागर—सरिता ।
परी रूपें एकरूपता ।
वर्षाकाळी मिळणी मिळतां ।
उरे न भिन्नता तादृश ॥४॥

तेवींच भावें सद्गुरुनाथा ।
भक्ती अनन्य शरण जातां ।
तोही भक्तांस देई निजगुरुता ।
पाहोनि सन्नकता भक्तांची ॥५॥

—श्रीसाईसच्चरित—अध्याय ४० वा

# अनुक्रमणिका–जुलै १९८०


१) संपादकीय — श्रीसाईबाबा पुन्हा प्रगटले तर

२) सद्‌गुरुंच्या चरणकमळी तीर्थराज वसती — श्री. र. शं. गुजरकर

३) श्रीदासगणूंच्या दृष्टीकोनातून दिसणारे साईबाबा — श्री. दिगंबर गंधे

४) हरिओम आश्रम–मौन मंदिरे — ले. क. मु. ब. निंबाळकर

५) श्रीसाईबाबांची सूत्रद्वादशी — श्री. रमेश चव्हाण

६) मला भेटटलेले श्रीसाईनाथ — सौ. कुमुदिनी टिळक

७) जिथे साईनामाचा गजर, तिथे बाबा हजर — श्री. विलास पडवळ

८) श्रीबाबांचे उपदेश — श्री. प्रेम बागरेच्चा

९) महर्षी योगी श्रीगगनगिरी महाराज — प्रा. डॉ. चारुशिला गुप्ते

१०) धन्य बाबा धन्य तुमची — श्री. अण्णासाहेब विंचूरकर

११) सद्‌गुरूंचा गोड उपदेश — श्री. अनिल केशवराव रसाळ

१२) श्रीसाई जेव्हा अस्तित्वात होते — श्री. बिपीन क. स्वादिया

१३) दोन घटना — श्री. अनिल पंडित

१४) शिरडीवृत्त —

१५) गुरुपौर्णिमा — डॉ. सुमन खानविलकर

१६) काय केले साईबाबा — प्रिं. श्री. तु. नाईक

१७) देवकीनंदन गोपाला तू — श्री. मधु खोकले

१८) साईचरणी जीव जडला — श्री. रमाकांत पंडित

१९) सोडी मायेचा पिंजरा — सौ. रेखा तासकर

२०) साईनाथाची आरती — श्री. गं. म. जाधव


☆ ☆ ☆

## संपादकीय –

स. न. वि. वि.

# श्रीसाईबाबा पुन्हा प्रगटले तर !

यदायदाहि धर्मस्य, ग्लानिर्भवति भारत ।

अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ असे गीतेत वचन आहे. जगात कोलाहल माजला, अधर्म, अनितीचा सुळसुळाट झाला की मी अवतार घेतो, असे भगवान गीतेत सांगून गेले आहेत. आज मानवाने विज्ञानात प्रगती बरीच केली आहे. परंतु तो भोगी झाला आहे. मानवता पार रसातळाला गेली आहे. मानवाची जीवनमूल्ये आज नष्ट झाली आहेत. जीवननिष्ठावरील श्रद्धा नष्ट झाल्या आहेत. कनक आणि कामिनीसाठी माणूस माणसाचा दिवसाढवळया खून पाडायला कचरत नाही; दारु ही फॅशन होऊ बघते आहे, अशा अत्यंत बिकट परिस्थितीला नीट ताळयावर आणण्यासाठी, चांगला मार्ग दाखविण्यासाठी परमेश्वराच्या अवताराला योग्य काळ जवळ आला आहे असे आम्हाला वाटते, आणि म्हणून भगवान साईनाथांनी प्रगट व्हावे असे प्रकर्षाने वाटू लागते. परंतु त्यांचा अवतार होण्यासाठी योग्य काळ जवळ आला आहे अथवा नाही हे त्यांचे त्यांनाच ठाऊक !

कदाचित् त्यांच्या दृष्टीने याहीपेक्षा दुराचार, अधर्म बोकाळल्यावर त्यांचा अवतार व्हावयाचा असेल ! ! कुणी सांगावे त्यांच्या मनात काय आहे ? पण एवढे मात्र खरे की त्यांचा अवतार हा होणारच, ते प्रगटल्याशिवाय राहणार नाहीत; यात कोणतीच शंका नाही. कारण त्यांचे वचन आहे की ' मी आठ वर्षाचा बालक म्हणून पुन्हा प्रगट होईन ' पण केव्हा, कोठे व कोणत्या प्रकारे ते प्रगट होतील हे काही सांगता येणार नाही. भारतभूमी ही ईश्वरी अवतारांची भूमी आहे, तेव्हा साईबाबा भारतभूमीवरच पुन्हा प्रगटतील; नव्हे त्यांनी प्रगट व्हावे अशी आमची त्यांना कळकळीची प्रार्थना आहे, दयाघन साईनाथ या आमच्या प्रार्थनेकडे लक्ष पुरवतील अशी आमची खात्री आहे.

साईनाथ कोठेही प्रगट झाल्याशिवाय राहणारच नाहीत. कारण त्यांनी थट्टेने उच्चारलेल्या शब्दांचे सत्य प्रत्यंतर प्रत्येक वेळा आले आहे. मामलतदार देवांकडील व्रतोद्यापन प्रसंगी बंगाली गोपालकांच्या वेषात येऊन साईनाथांसमवेत दोघेजण येऊन जेवून गेले. अशा तऱ्हेने साईनाथ आपल्या शब्दाला जागले. औरंगाबादेहून पालीची बहीण येणार म्हणून भिंतीवरील पाल आनंदाने चुकचुकत आहे असे साई

जेव्हा भक्तांना म्हणाले तेव्हा सर्वांना थट्टा वाटली पण जेव्हा औरंगाबादेहून येणाऱ्या वाटसरूच्या सामानातून निघालेली पाल भिंतीवर जाऊन पहिली समवेत गिरक्या घेऊ लागली तेव्हा थट्टेचे सत्य प्रत्यंतर सर्वांच्या नजरेस आले. तेव्हा त्यांनी दिलेल्या वचनाला ते जागतील यात शंकाच नाही. श्रीबाबांच्या बोलाचे सत्य प्रत्यंतर घडून आल्याचे दर्शविणारे अनेक दाखले अण्णासाहेब दाभोलकरांनी श्रीसाईसच्चरितात दिलेले आहेत.

आता प्रश्न पडतो तो असा की जर बाबा पुन्हा प्रगटले तर काय होईल! काय होणार!...इतर सत्पुरुषांच्या, अवतारांच्या वाट्याला जशी प्रथम अवहेलनाच आली, हेटाळणी त्यांच्या पदरी पडली; कदाचित् तशीच साईबाबांच्याही वाट्याला येईल. ज्ञानेश्वर बंधू-भगिनींचा छळ काय कमी झाला? तुकारामाला छळणारे मंबाजी व रामेश्वरभट्टासारखे लोक काय कमी होते? चोखोबाला पायरीशीही बसू न देणारा हा समाजच होता ना? तेव्हा तशीच अवहेलना साईंना या अवतारात येईल. कदाचित पूर्वी कधी नव्हता इतका हा समाज अश्रद्ध, मानवता विरहीत, भोगी, जडवादी झाल्याने पूर्वी झालेल्या अवतारात आला नसेल इतका त्रास, छळ त्यांच्या नशिबी येईल. मंबाजीसारख्या विरोधकांचे निंदकांचे मोहोळ उठलेले दिसतील. पण टाकीचे घाव सोसल्यानंतर देवपण उजळून निघेल, चमकून दिसेल. देवपणही उठून उभे राहील व मग हे सगळे मंबाजी, रामेश्वरभट्ट (इत्यादी निंदकवर्ग) त्यांच्या पायाशी लोळण घ्यायला धडपडू लागतील व अशा लोकांनी इतके छळले, इतका त्रास दिला तरी अनंत कोटी ब्रह्मांड नायक राजाधिराज योगीराज भगवान साईबाबा आपल्या दयार्द्रतेने त्यांना जवळ केल्याशिवाय राहणार नाहीत, त्यांना ते जवळ करतीलच; नव्हे त्यांचाच उद्धारासाठी कदाचित् ते अवतरणार असतील.

या भोगवादी, जडवादी जगाच्या चिखलातून उगवलेलं हे कमळ आपल्या गुणसुगंधाने ह्या भक्तगणरुपी भ्रमरांना आपल्या दयारुपी मधुसेवनासाठी आकर्षिल्या शिवाय राहणार नाही. या अवतारात त्यांची जी कोणती कर्मभूमी राहील, जी कोणती शिरडी राहील तेथे ते आपल्या तेजाने चमकल्याशिवाय राहणार नाहीत, कारण शेवटी "हिरा तो हिराच!"

मागील अवतारात देशकाल परिस्थितीला अनुसरुन त्यांनी विशिष्ट पद्धतीने मार्गदर्शन केले व सांप्रतच्या काळात ते कोणत्या प्रकारे मार्गदर्शन करून तीच मानवधर्माची, सर्व धर्म समभावाची, शाश्वत धर्माची शिकवण देतील हे आज तरी या क्षणी सांगता येणार नाही, पण एवढे मात्र खरे की साई जो कोणता मार्गदर्शनाचा मार्ग स्वीकारतील त्यात सर्व भक्तगणांचे व चाहत्यांचे कल्याणच होईल, हितच होईल.

पण हे सुद्धा तितकेच खरे की महाराजांच्या मनात ज्याला म्हणून जवळ करायचे असेल अथवा ज्याची वेळ आली आहे असे त्यांना वाटत असेल त्याच्याच मनात त्यांच्याविषयी श्रद्धा, अत्यादर निर्माण होईल. त्याबाबतीत कोणाचा नंबर लागेल हे जाणणारे फक्त तेच त्रिकालज्ञ आहेत. आपण फक्त प्रार्थना करीत राहणार की प्रभू जर आपण आमच्या जीवनकाळात पुन्हा प्रगटलात तर आम्हा दीन चातकांना आपल्या पायी जागा द्या. साईंनी स्वतःही म्हटले आहे की "तुम्हीं कितीही दूर गेले तरी मी तुम्हाला दोरी बांधलेल्या चिडीप्रमाणे ओढून माझ्या पायी आणून ठेवीन."

पण एक गोष्ट अगदी खरी की श्रीसाईंच्या अवताराने विश्वबंधूत्वाचा दिव्य शाश्वत मार्ग अखिल जगाला दाखविण्याचे श्रेय भारताला प्राप्त होईल.

"डगमग जग ये डोल रहा है"! अशी सध्याची परिस्थिती असताना" खोलके आँखे देख ले बाबा ! तेरे बिना यहाँ क्या होता है!!

लौटके आजा साई हमारे। अपनी आँखे खोलो।" अशी आपण संत चूडामणी श्रीभगवान साईबाबांना गुरुपौर्णिमेच्या महोत्सवा निमित्य तत्पूर्वी प्रार्थन करू या.

# शिरडी येथील गुरु पौर्णिमा उत्सव

सर्व साईभक्तांना कळविण्यात येते की यंदा शिरडी येथे श्री गुरुपौर्णिमा महोत्सव शनिवार दिनांक २६ जुलै ते सोमवार दिनांक २८ जुलै १९८० पर्यंत नेहमीप्रमाणे थाटाने साजरा केला जाईल. सर्व साईभक्तांनी हेच निमंत्रण समजून महोत्सवास हजर राहून संस्थानात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वतोपरीने सहकार्य द्यावे अशी विनंती मे. कोर्टरिसिव्हर साहेब श्रीसाईबाबा संस्थान शिरडी हे करतात.

"तुम्ही माझ्याकडे पहा मी तुमच्याकडे पाहिन"
बाबांच्या या महान मंत्राची रंजक जन्मकथा

# सद्गुरूच्या चरण कमळी तीर्थराज वसति!

—श्री. रघुनाथराव शं. जुन्नरकर
९।१३ पिरामल नगर, विवेकानंद मार्ग,
गोरेगाव (पश्चिम) मुंबई ६२

[ श्री. रघुनाथ शं. जुन्नरकर यांच्या "मशिदीत प्रगटला परमेश्वर!" या कादंबरीचे हे एक प्रकरण! दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या या कादंबरीनं वाचकांनां साईभक्तीचं अक्षरशः वेड लावलं असून या पुस्तकाची पारायणावर पारायणे होत आहेत. साईबाबांनी दासगणूना गंगा-यमुना या दोन पवित्र नद्यांचं दर्शन स्वतःच्या पायांच्या अंगठ्यातून घडविलं त्या प्रसंगाचं हे नाट्यमय वर्णन : ]

बाबांच्या चमत्कारानी आणि त्यांच्या पहिल्याच मनोमय दर्शनानं नानासाहेब चांदोरकर इतके प्रभावित झाले की दुसऱ्याच दिवशी ते आपल्या कुटुंबाला आणि मुलीला घेऊन पुन्हा बाबांच्या दर्शनाला हजर झाले! गणेशरावही (दासगणू) बरोबर होतेच. नानांनी मुलीला बाबांच्या पायावर घातलं आणि म्हणाले.

"बाबा, ही आमची मुलगी, मैना!"

त्या सात आठ वर्षांच्या बालीकेकडे बाबा कितीवेळ तरी टक लावून पाहत होते! त्यातल्या त्यात तिच्या कपाळाकडेच त्यांचं लक्ष होतं. जणू काय तिच्या भाळी लिहिलेलं भवितव्यच ते वाचून घेत होते : शेवटी त्यांना काय वाटलं कुणाला ठाऊक, तिला त्यांनी जवळ घेतली आणि स्वतःच्या मांडीवर बसवून धुनितील विभूति तिच्या कपाळावर फासली. वैराग्याची ही राख त्यांनी तिच्या का फासली हे कोणालाच कळलं नाही. कारण भवितव्यच ते ठरविणार होतं! पण नानांना मात्र ते खटकलं. कारण काल आणि आजही सर्वांना मिळणारा 'अल्ला भला करेगा' हा बाबांचा केवळ आशीर्वाद तिला लाभला नाही. बाबांनीही त्यांच्या या कृतीवर काहीच भाष्य केलं नाही!

दरम्यान नानांच्या कुटुंबानं बाबांना मनःपूर्वक नमस्कार केला. घरात कडक सोवळं! शिरडीला जाण्यासाठी निघताच मुसलमान संताकडे सुनेला आणि नातीला घेऊन मुलगा जातो आहे हे कळताच नानांच्या वडिलांनी आकांडतांडव केलं!

अशा तंग वातावरणात नवऱ्याच्या बरोबर ही माऊली मुलीला घेऊन बाबांच्या दर्शनाला आली होती. मुलीचं भवितव्य चांगलं नाही, तरूण वयातच तिला वैधव्याची शक्यता आहे, तिच्या स्वतःच्या जीवाला सुद्धा लग्नानंतर धोका आहे असं भविष्य एका ख्यातनाम ज्योतिषानं केल्यानं या माऊलीच्या मनाला चिंता लागून राहिली होती, आणि म्हणूनच नवऱ्याच्याच तोंडून बाबांचे चमत्कार ऐकून घरच्या तीव्र विरोधाला न जुमानता ती मुलीला घेऊन बाबांच्याकडे आली होती. तिचं भवितव्य बाबांनी बदलावं आणि ते बदलण्याचं सामर्थ्य त्यांच्यात आहे असं वाटत होतं, म्हणून तिनंच बाबांच्याकडे यायचा हट्ट धरला आणि नानांच्या बरोबर ती दर्शनाला आली. मुलीला आशीर्वाद न मिळता तिच्या कपाळावर राख फासली गेली. याचा अर्थ काहीच निश्चित नसल्यानं आणि प्रथम दर्शनीच विचारण्याचं धैर्य दोघांनाही नसल्यानं ते गप्पच राहिले. बाबांनी सर्वांनाच बाजूला बसवून घेतलं आणि गणेशरावांना ते म्हणाले,

"हं ! काय रे हवालदार, काय काय मनसुबे रचून आलास ?"

बाबांनी आपल्याला हवालदार म्हटलं, म्हणजेच आता पोलीसची नोकरी करणार आहोत हे त्यांनी बरोबर ओळखलं हे गणेशरावांच्या लक्षात आलं. त्याचबरोबर पोलीस खात्यात सब-इन्स्पेक्टर पर्यंत बढती घेत जाण्याची आपली महत्त्वाकांक्षाही बाबांच्या लक्षात आली आहे हे चाणाक्ष गणेशरावांना कळून चुकलं ! बाबाच पुढं म्हणाले.

"गणू, पोलीसात जाशील, तमासगीर होशील ! कशाला हवी तुला बामणाला शिपायाची नोकरी ?"

बाबांच्या पासून काहीच लपून राहत नाही हे गणेशरावांच्या प्रत्ययाला आले. आपल्याला तमाशाचा नाद आहे याची आपण नानांना दाद लागू दिली नव्हती— पण बाबांनी नेमकं तेच बाहेर काढलं. बाबांच्या अंतर्ज्ञानानं गणेशरावांचा तोरा आता पार नष्ट होऊ पाहत होता. निदान बाबांच्या पुढे तरी ! ते काही बोलणार इतक्यात नानाच म्हणाले.

"बाबा, याला मीच पोलीस दलात घ्यावं अशी शिफारस केली आहे. त्याने फार दिवस लकडा लावला होता माझ्या मागं !"

"नाना, अरे तुझं काम तू केलंस ! पण तिथं त्याला लई त्रास होईल बघ. नको असली नोकरी !" बाबा म्हणाले.

आता नानाच बाबांच्या सांगण्या प्रमाणं आपल्या नव्या नोकरीत मोडता घालतील की काय अशी भीती वाटून गणेशराव म्हणाले.

"बाबा, आता नव्या नोकरीवर रूजू होण्याचा हुकूमही मला मिळाला आहे. तेव्हा ती आता तरी नाकारता येणार नाही. मी प्रयागला जाऊन येईन आणि या नोकरीवर रूजू होईन."

"प्रयागला ? कशाला रे ?" बाबांनी विचारलं.

"ते आम्हा हिंदूंचं मोठं तीर्थ आहे, बाबा, कुंभ मेळा चालू आहे आणि गंगामाई वाहते आहे तिथं. नोकरीत पडलो की मग काही जाणं होणार नाही !"

"खरं रे ! पण सारं जगच तीर्थ आहे ! पुण्य क्षेत्र आहे ! माणूस जन्म घेऊन इथं आला, आपल्या धर्मानं–माणूसकीच्या धर्मानं चालला तर त्याचं कल्याणच होणार. त्याला गंगा-स्नान कशाला हवं ?"

"बाबा, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे, पण आमच्या धर्मात गंगास्नानाला फार महत्त्व आहे !"

बाबा मुसलमान आहेत हे गृहीत धरूनच गणेशराव त्यांच्याशी बोलत होते. त्यांना गंगा-स्नानाचं महत्त्व काय कळणार असा विचारही त्यांच्या मनाला चाटून गेला. इंग्रजी शिक्षण नसलं तरी घरच्या हिंदुत्वनिष्ठ सांस्कृतिक वातावरणामुळे त्यांचं हिंदुंच्या धार्मिक ग्रंथांचं वाचन चांगलंच होतं. त्यामुळं त्यांना हिंदु धर्माचा अभिमानही होता. शिवाय आपल्या वाचनाचा अहंकारही होता. त्या पायी बाबांशी बोलताना सुद्धा त्यात अहंकाराची छटा होतीच. बाबांनी ते ओळखलं आणि म्हणाले.

"अरे गणू, ते ठीक आहे. पण त्या करिता इतका पैसा खर्च करून इतकं दूर कशाला जायला हवं ? आपल्या जवळच तर गंगा आहे !"

गोदावरीच्या बद्दलच बाबा बोलताहेत असं वाटून गणेशराव म्हणाले, "होय बाबा, आपल्या कोपरगावाची गोदावरी गंगाच आहे. पुराणात सुद्धा 'दक्षिण-गंगा' म्हणून तिचा उल्लेख आहे, पण काशीच्या गंगेचं आणि प्रयाग जवळील गंगा-यमुनेच्या संगमाचं महात्म्य वेगळच आहे !"

आपल्या हिंदु-धर्माच्या ज्ञानाचं थोडंतरी प्रदर्शन बाबांना घडविण्याच्या दृष्टीने गणेशराव बोलत होते. पण बाबांच्या मनात वेगळेच विचार चालू होते। त्यांना गणेश आणि नानांनाही पटवून द्यायचं होतं की सद्‌गुरूचे पाय म्हणजेच पवित्र तीर्थ क्षेत्र ! ते पाय धरले की आणखीन काही करावं लागत नाही. गुरू हाच ब्रह्मा, हाच विष्णू आणि तोच महेश ! सर्व काही तोच ! हेच आता गणेशरावांना समजून यावं यासाठी बाबा हा वाद घालून होते. कारण त्यांच्या या गणूकडून त्यांना फारच मोठं कार्य करून घ्यायचं होतं. म्हणून बाबा म्हणाले.

" गणू, अरे कोपरगाव आणि प्रयाग तरी कशाला हवीत गंगा यमुनेसाठी?"

बाबांच्या या प्रश्नानं बाजूलाच बसलेले म्हाळसापती आणि माधवराव सावध झाले. बाबांच्या बोलण्याचा त्यांना आता चांगलाच सराव झाला होता. पुन्हा एकदा हा परमेश्वर आपल्या दिव्यत्वाचा प्रत्यय गणेश सहस्त्रबुद्ध्याना देण्याच्या तयारीत आहे हे त्यांनी ओळखलं. या नव्या चमत्कारासाठी ते सावरून बसले! मात्र गणेश सहस्त्रबुद्धे हा नाना चांदोरकरांचा केवळ पट्टेवाला असल्यानं त्याला बाबांनी इतकं महत्त्व का द्यावं हे दोघानाही गूढ होतं! बाबांच्या प्रश्नाचा अभिप्रेत हेतु लक्षात न आल्यानं गणेशराव म्हणाले.

" बाबा, प्रयागला जाऊन गंगा-यमुनेचं दर्शन घ्यायचं नाही तर मग जायचं कुठं?"

" अरे, सद्गुरूच्या पायातच सर्व तीर्थं असतात! माहीत आहे ना तुला?"

' म्हणजे साईबाबा स्वतःलाच सद्गुरू म्हणवून घेतात हे आपल्याला वाटतं ते बरोबर आहे तर' असा विचार गणेशरावांच्या मनात आला. त्यांच्या मते बाबा हे मुसलमान असल्यानं सद्गुरू होऊच शकत नाहीत. सद्गुरू हा हिंदूच असला पाहिजे ही त्यांची भावना! त्यांना हेही माहीत होतं की बाबांना बरेच हिंदु भक्त सद्गुरू स्थानीच मानीत! आणि हेच त्यांच्या आणि नानांच्या कर्मठ मनाला खट-कायचं! म्हणून नानाच मध्ये पडून म्हणाले,

" बाबा, आमच्या शास्त्रात असं म्हटलं आहे हे खरं आहे. पण मला वाटतं त्याचा अर्थ अक्षरशः घेऊ नये!

" का नाही?" बाबांनी विचारलं.

आपले साहेबच आता मध्ये पडले आहेत हे पाहून गणेशरावांना धीर आला. ते बाबांना म्हणाले.

" बाबा, तुम्हाला सुद्धा आमचे बरेच हिंदु सद्गुरू समजतात. तुम्ही तर मुसलमान आहात! तुमच्या पायात या पवित्र नद्यांचं तीर्थ कसं असेल?"

बाबांना आता राहवेना! मुसलमान, हिंदु, जात-पात, या माणसा माणसानं निर्माण केलेल्या भेदामुळे ते भडकले होते! पण न रागवता शांतपणानं ते गणेश-रावांना म्हणाले,

' गणू, तू आपल्या आईच्या पायावर कधीतरी डोकं ठेवलं असशील ना?'

' होय बाबा!' गणेशराव म्हणाले,

' का?'

' ती मूर्तिमंत मांगल्य आणि वात्सल्य यांचे प्रतिक आहे म्हणून!'

'तू पंढरपूरच्या विठ्ठलाच्या पायावर डोकं ठेवलं होतंस ना ?'

'होय बाबा !'

'का ?'

'कारण तो ईश्वर आहे म्हणून !'

'काल तू माझ्याही पायावर डोकं ठेवलंस ! का ?'

'तुम्ही ईश्वरस्वरूप आहात असं वाटल्यानं !'

'आता सांग ईश्वरात आणि सद्‌गुरूत काय फरक आहे ? तुमच्या हिंदु ग्रंथात सांगितलं आहे ' गुरुब्रह्मा, गुरूविष्णु : गुरूर्देवो महेश्वर : ! खरं ना ?

'होय बाबा !'

तुम्ही त्याचा अर्थ करता गुरू हाच ब्रह्मा, गुरू हाच विष्णु आणि गुरू हाच महेश ! होय ना !'

'होय बाबा !' नाना म्हणाले. बाबांना संस्कृतचं ज्ञान असावं असं वाटल्यानं त्यांनी आता बोलायला सुरूवात केली.

'नाना, त्याहीपेक्षा त्याला वरचा अर्थ आहे ! ब्रह्मा हाच गुरू, विष्णु हाही गुरू आणि महेश हाही गुरूच ! ब्रह्मा, विष्णु, महेश–ईश्वराचीच वेगळी वेगळी रूपं ! खरं ना ?' बाबांनी या सुभाषिताचा अर्थ विषद केला.

'होय बाबा !' नाना म्हणाले.

'मला तुम्ही काल नमस्कार केलात ईश्वर स्वरूप म्हणून. त्यावेळी माझ्या जातीचा आणि धर्माचा तुम्ही विचार केला नाहीत. मग मला या तीन ईश्वरीरूपातून लोक सद्‌गुरू मानायला लागले तर त्यांचं काय चुकलं ?' बाबांनी सरळ सरळ प्रश्न केला.

'मग तुमचे हे पाय तीर्थंच मानायला हवेत !' गणेशरावही आता निर्भिड-पणे बोलत होते. माधवराव म्हाळसापती आणि इतर सारेच भक्त अस्वस्थ झाले होते. एक पट्टेवाला बाबांशी इतकी सलगीची आणि निर्भीड चर्चा करीत होता हे कोणालाच आवडलं नव्हतं. आतापर्यंत येऊन गेलेल्या मोठमोठ्या विद्वान भक्तांनाही हे धैर्य झालं नव्हतं, फार काय गणेशरावांचे साहेब नानासाहेब चांदोर-करही मर्यादेला चिकटून होते. गणूच्या निर्भीड प्रश्नाला बाबांनीही स्पष्ट सवाल टाकला.

'अर्थात् ! माझे पाय तीर्थं नाहीत असं कोण म्हणेल ? अरे, तीर्थ म्हणजे केवळ नदी किंवा पाणी नव्हे ! तीर्थ म्हणजे ईश्वराचा वास असलेली जागा !'

'पण बाबा, तीर्थं क्षेत्र म्हटलं की त्या ठिकाणी नदी असली तरच ते तीर्थ-यात्रेचं ठिकाण होतं !'

'होय. खरं आहे तुझं म्हणणं ! म्हणूनच म्हणतो या पायांचं दर्शन घेतलंस ना ! आता प्रयाग तरी कशाला हवं ?

'कारण इथं तुमच्या पायात गंगा यमुना दिसत नाहीत म्हणून !' गणेशरावांनी सडेतोड सांगितलं !

'अरे गणू, सद्गुरूच्या पायातील गंगा यमुना दिसायला मनःचक्षु लागतात !'

'ते माझ्या जवळच नाहीत, बाबा ! मी मान्य करतो !'

'ठीक आहे ! इतकं मानलंस तरी पुरे ! त्यासाठीच सद्गुरूची गरज असते !' बाबा म्हणाले.

'बाबा मीही तुम्हाला सद्गुरू मानीन—पण या पायात मला साक्षात् गंगा-यमुनांचं दर्शन झालं पाहिजे ! प्रयाग तीर्थ या तुमच्या दोन पायात आहे हे सिद्ध झालं पाहिजे !'

गणेशरावांनी सरळ सरळ आव्हान केलं ! बाबा आतापर्यंत चमत्कार करीत—पण स्वच्छेनं ! एका सामान्य पट्टेवाल्यानं चमत्कार करून दाखवायचं त्यांना आव्हान दिलं होतं ! पण बाबा रागावले नाहीत. अशा भक्ताचा नमस्कार चमत्काराशिवाय मिळत नाही हे त्यांना माहीत होतं. या भक्ताची त्यांना नितांत गरज होती. जगाच्या कल्याणासाठी ! गणूचे लाड पुरवायचे त्यांनी ठरविलं. मशिदीतला सारा भक्तगण स्तब्ध उभा राहिला. तटस्थ झाला ! बाबांच्या पायाकडे सर्वांच्या नजरा खिळून राहिल्या. बाबांनी आपले दोन्ही पाय पुढे केले. म्हणाले,

'ठीक आहे गणू ! नीट लक्ष पूर्वक पहा या पुरातन पायांकडे ! डोळे भरून पाहून घे !'

बाबा इतकं म्हणताहेत तोच त्या युगायुगातून वाटचाल केलेल्या ईश्वरी पावलांच्या दोन्ही अंगठ्यांतून घळघळ पाणी वाहू लागलं ! गंगा यमुनेच्या दोन स्वतंत्र धारा ! सुंदर गोमुखांसारख्या दिसणाऱ्या त्या अंगूळ-द्वयातून, एक शुभ्र धवल-दुसरा नील-आकाशासम शामवर्णीय ! त्या दोन्ही धारांचे सुरेख मीलन बाबांच्या पायाजवळच होऊन प्रयाग तीर्थाच्या पवित्र संगमाचं दृश्य शिरडीच्या द्वारका मायीतच साकार झालं ! आनंदानं बहरून गेलेल्या भक्त-वृंदानं बेभान होऊन बाबांचा जयजयकार केला. शिरडीतल्या या मशिदीला पंढरीचं स्वरूप आलं. विठ्ठलाच्या पायाशी वाहणारी चंद्रभागा साईनाथांच्या पाया जवळून वाहू लागली. त्या पवित्र तीर्थाचं पहिलं प्राशन केलं चांदोरकरांच्या पत्नीनं ! साई-भक्तीनं भारावलेल्या या माऊलीला घरातल्या कर्मठ सोवळ्याचा बांध अडवू शकला नाही !

साईबाबा मुसलमान म्हणून दूर राहणाऱ्या तिच्या नवऱ्याची तिला आता भीति वाटली नाही! तिच्या पाठोपाठ तिच्या मुलीनं, लहानग्या मैनेनं पण तिचं अनुकरण केलं! नाना मात्र केवळ पाहत राहिले! ते भारावले होते-पण संस्कारानी आणि रूढीनं गुलाम केलेल्या त्यांच्या मनाला या मुसलमान अवलियाच्या पायाचं तीर्थ प्राशन करणं प्रशस्त वाटलं नाही. त्यांनी ते फक्त आपल्या डोळ्यांना लावलं, डोक्यावर शिंपडलं! नानांपेक्षाही कर्मठ असणाऱ्या गणूनं तर त्याला स्पर्शसुद्धा केला नाही! मात्र साईंच्या दिव्यत्वाची साक्ष त्याला पटली. साईंना सद्गुरू म्हणून त्यानं मान्य केलं! बाबांना पाहून गणूला आपल्या इष्ट दैवताची आठवण झाली! पंढरीचा विठ्ठल हाच साईनाथ असं त्याला आता वाटू लागलं. त्या अचाट चमत्कारानं मंत्रमुग्ध झालेलं त्याचं मन गावू लागलं! मनानं गाईलेल्या त्या काव्य-पंक्ती त्याच्या मुखातून बाहेर पडू लागल्या.

शिरडी माझे पंढरपूर ।
साईबाबा रमावर ॥
शिरडी माझे पंढरपूर ॥
याहो याहो अवघे जन
करा बाबांसी वंदन ॥
गणू म्हणे बाबा साई
धाव पाव माझे आई ॥

याहो याहो अवघे जन, करा बाबांसी वंदन ' या पंक्ती ऐकताच सारा गाव, सारे भक्त बाबांच्या पायांचं तीर्थ आपल्याला मिळावं म्हणून झुंबड करून धावले. बाबांच्या सहवासात राहून मोठमोठ्या चमत्कारांची लोकांची प्रतिक्रीया अवगत असल्यानं माधवराव, म्हाळसापती, तात्या कोते वगैरे मंडळींनी त्या मोठ्या बेभान झालेल्या जनसमुदायाला वेळीच आवर घातला आणि सर्वांनाच शांत मनानं तीर्थाचं दर्शन आणि प्राशन घडविलं. साईंच्या पायांच्या अंगठ्यांतून वाहणाऱ्या त्या चिमुकल्या गंगा-यमुना किती वेळ तरी वाहत होत्या. चंद्राकार चंद्रभागेच्या अर्धवर्तुळात! सर्वांचं दर्शन शांत मनानं संपलं. त्या बरोबरच गणूची काव्य गंगाही वाहायाची थांबली! गणूनं बाबांच्या पुढं साष्टांग नमस्कार घातला आणि जयघोष केला.

"गुरूब्रह्मा गुरूविष्णु : गुरूर्देवो महेश्वर :
साई साक्षात् गुरुब्रह्म तस्मै श्रीगुरवेनम : ॥

गणूला भावनावेग आवरला नाही. कबूल केल्याप्रमाणं साईबाबांना सद्गुरु मानायला तो तयार झाला. बाबांना म्हणाला.

'साईनाथ, तुम्ही आता माझे सद्‌गुरु आहांत ! तुम्हीच मला उपदेश द्या, दीक्षा द्या !'

'नाही रे बापा ! गणू, मी कोणालाच मंत्र दिला नाही, कारण माझ्या गुरुनेच माझे कान फुंकले नाहीत–मला उपदेश दिला नाही ! माझ्या गुरुची मी बारा वर्षे मनोभावे सेवा केली. त्यांनीही मला प्रेम दिलं—माझं पालन पोषण केलं ! मनात आलं आपल्या गुरुकडून आपण गुरू-मंत्र घ्यावा, म्हणून मी त्यांना म्हटलं, 'गुरुदेवा मला उपदेश द्या !' गुरुदेव बोलले नाहीत, हसले फक्त ! त्यांनी न्हाव्याला बोलावलं, माझं साफ मुंडन करवलं. मुंडन करवलं माझ्यातील अहंकाराचं ! आणि माझ्याकडून फक्त दोनच पैसे मागितले. मला काहीच समजेना माझ्या गुरुला हे दोन पैसे कशासाठी लागले ? त्यातून मी तर निष्कांचन ! मी कुठले पैसे देणार ? मी गोंधळलो. ते पाहून तेच म्हणाले, ' अरे वेड्या, तुझे ते पैसे नकोत मला ! मला हवी आहे तुझी निष्ठा आणि सबुरी ! निष्ठा म्हणजे श्रद्धा आणि सबूरी म्हणजे धीर ! धीर धर आणि श्रद्धा ठेव हेच त्यानी मला सुचविलं, हे दोन पैसे मी तेव्हाच देऊन टाकले. नाही भाषण, नाही देणं, नाही घेणं ! माझे गुरूदेव ध्यान लावून बसत–दिव्य आनंदाचा अनुभव घेत ! मी बसे फक्त त्यांच्याकडे पाहत ! कधी जवळ कधी दूर ! फक्त त्यांच्यावर नजर ठेवून ! हाच उपदेश आणि हाच त्यांचा मंत्र ! त्यांचं ध्यान सुद्धा कसं ? कधी डोळे मिटून–कधी उघड्या डोळयांचं ! त्यांची निश्चल नजर माझ्यावर कृपेचा वर्षाव करी आणि मीही स्थिर नजरेनं डोळयात ती सामावून घेत असे. त्यांच्या निश्चल नजरेनच माझं पालनपोषण होई. कासवी आपल्या पिल्लांचं करते तसं, ती त्यांच्या तोंडात भरवीत नाही तर केवळ निश्चल नजरेनं त्यांचं पालन पोषण करते ! ती पिल्लं नदीच्या पैलतीराला असली तरी ! मी मंत्र दिला नाही तरी तुम्ही कुठेही असा मी तुमच्या जवळच् आहे. ध्यानात ठेवा हे सारं ! तुम्ही माझ्याकडे पहा, मी तुमच्याकडे पाहीन !'

या महान उपदेशाचा एक एक शब्द बाबा सावकाश उच्चारत होते आणि या मौलीक उक्तीचं मनन सारीच भक्त मंडळी एकाग्र मनानं करीत होती. मशिदीत निस्तब्ध शांतता पसरली होती ! गणेशराव सहस्त्रबुद्धयांच्यामुळं आज सर्वच भक्तांना एक महान प्रवचन ऐकायला मिळालं. 'तुम्ही माझ्याकडे पहा–मी तुमच्याकडे पाहीन' या महान मंत्राचा उगम या दिवशी झाला !

गणेशरावांना आपलं जीवन धन्य झाल्यासारखं वाटलं ! ते, नाना आणि त्यांची मंडळी जड अंतःकरणानं शिरडीतून बाहेर पडली !

# श्रीसाईलीला

## येत्या विजया दशमीचा अंक

## खास बालसाहित्य विशेषांक

श्रीसंत चूडामणि सद्‌गुरु श्रीसाईबाबांच्या ६२ व्या पुण्यतिथी निमित्य श्रीसाईलीला मासिकाचा येत्या विजयादशमीचा अंक हा **बालसाहित्य विशेषांक** म्हणून यंदा प्रथमच प्रकाशित करीत आहोत.

श्रीसाईलीला मासिक थोरामोठ्यांप्रमाणेच घरोघरी मुलामुलींच्याही हातात जात असते. तेव्हा मुलामुलींच्या श्रीसाई भाव भक्तीला तसेच त्यांच्या श्रीसाई विषयक साहित्याला वाव देऊन हे मासिक आबालवृद्धांपर्यंत आणखीन अधिकाधिक कसे लोकप्रिय करता येईल याकडे आमचे लक्ष केंद्रीभूत आहे. यास अनुसरून साईलीलेचा श्रीसाई महानिर्वाण विशेषांक हा श्रीसाई बाल-विशेषांक म्हणून प्रकाशित करण्याचे योजिले आहे.

आमच्या छोट्या वाचक बंधू-भगिनींनी आपापले लेख-कविता इत्यादी सर्व प्रकारचे श्रीसाईबाबांच्या विषयींचे साहित्य १५ ऑगस्ट १९८० पर्यंत सुवाच्च अक्षरात कागदाच्या एकाच बाजूने भरपूर समास सोडून १५ ऑगस्ट १९८० पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावे. लेख पाठविणाऱ्या मुलामुलींची वयो-मर्यादा सर्व साधारणपणे १६ वर्षा पर्यंतची असावी, लेखांचे विषय श्रीसाई-बाबा, शिरडी, बाबांची भक्तमंडळी, साईबद्दल आपणास काय वाटते. आपण स्वतः साईभक्ती कशी करतो. बाबांनी आपणास कधी काळी मदत केली आहे काय ? संकटकाळात बाबांचा धावा, बाबा कधी तुमच्या स्वप्नात आलेत का ! इ. असा कोणत्याही स्वरूपाचा असावा. लेखाची मर्यादा तीन फुलस्केप पाने इतकी असावी.

**लेख**—साहित्य पाठविण्याचा **पत्ता**—श्री संपादक श्रीसाईलीला,
'साईनिकेतन' ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०१४

# श्रीदासगणूंच्या दृष्टिकोनातून दिसणारे श्रीसाईबाबा

—श्री दिगंबर शंकर गंधे
५३४ सदाशिव पेठ पुणे ३०

● श्रीसाईबाबांची शिरडी व श्रीगजानन महाराजांचे शेगाव ही दोन्ही ठिकाणे सध्या विशेष प्रकाशझोतात आहेत. या दोन्ही स्थानांना आता जे असाधारण महत्व प्राप्त झाले आहे. त्याला कारण त्या दोघांचे स्वयंभू व्यक्तिमत्व असले तरी संतांचे भाट असणाऱ्या श्रीदासगणूमहाराजांना त्याचे बरेचसे श्रेय दिल्यास अतिशयोक्तिचे होणार नाही असे वाटते. कारण श्रीसाईबाबांच्या खुद्द हयातीत श्री. दासगणूंनी (निकट वर्तियांचे दादा) वाङ्मय व कीर्तनद्वारा श्रीसाईबाबांचा (बाबा) कीर्तिध्वज बराचसा फडकावला होता. याची कबुली संस्थानतर्फे अधिकृत असलेले कै. गोविंदराव दाभोलकर (हेमाडपंत) यांनी लिहिलेले 'साईसच्चरित्र' या ग्रंथात पुढीलप्रमाणे दिली आहे.

उल्हास साईभक्तीचा। दासगणूने विस्तारला साचा। वाढविला साईप्रेमाचा। स्वानंदाचा सागर ॥ मुंबई प्रांती साईभक्ती। तियेचे मूळ या दोन व्यक्ति। (दासगणू आणि चांदोरकर) साईमहाराज कृपामूर्ति। तयांचे हाती. प्रकटले ॥ अध्याय १५ सन एकोणीसशे दहा साली। दासगणूंची कीर्तने झाली। श्री साईनाथांची कीर्ति पसरली। यात्रा वाढली शिरडीची ॥ ऐसे महात्म्य कथा कीर्तनी। दासगणूच्या ग्रंथातूनी। ऐकोनिया कर्णोपकर्णी। उत्कंठा दर्शनी उदेली ॥ अ. २६ सन १९४० पूर्वी बाबांच्या समाधीसमोर आरती करिता पाच सात लोकसुद्धा हजर नसत अशा ठिकाणी सध्या समाजातील निरनिराळ्या लोकांची अतोनात यात्रा बाबांच्या दर्शना करिता लोटत आहे. शिरडीस जाण्याकरिता कोपरगाव रेल्वे स्टेशन लागते. तेथे झेलम एक्स्प्रेस का थांबवावी या कारणात शिरडीस लांबलांबून येणाऱ्या लोकांची गर्दी असते असेही कारण नमूद केले जात आहे.

## गुरुतुल्यबाबा

नारद भक्तिसूत्रात 'तथापि न महात्म्यज्ञान विस्मृत्यपवाद' असे वर्णन केल्याप्रमाणे दादांची बाबांविषयी नितांत श्रद्धा होती. त्यांचे गुरू वामनशास्त्री इस्लामपूरकर यांनी महानिर्याणापूर्वी (सन १८९६) "साईबाबा योग्य विभूति आहेत. त्यांना माझे स्वरूप मान. आम्ही दोघे एक रूप आहोत. ते तुला मार्गदर्शन करतील" असे

सांगितले होते. असे सांगितले असले तरी विचक्षणामुळे दादांनी एकाएकी तो मार्ग स्वीकारला नाही. 'छात्र बोध' प्रकरणात ते स्वतःच म्हणतात.

सन अठराशे चौऱ्याण्णवी । त्यांनी (चांदोरकर) मला शिर्डीत । नेले साईंच्या दर्शनाप्रत । मीही झालो त्यांचा भक्त । काही दिवस गेल्यावरी ॥ हे काही दिवस म्हणजे त्यांनी गुरूबाबत केलेल्या परीक्षेचाच काळ असावा गुरू, कसा शोधावा या संबंधी त्यांनीच 'ज्ञानेश्वर' व 'जालंदर' आख्यानात काही कसोट्या सांगितल्या आहेत. 'ज्ञानेश्वर' आख्यानात चांगदेवाने आपल्या शिष्यास ज्ञानेश्वरादि भावंडांचा दिनक्रम काय होता याचा तपास करावयास सांगितला होता. ते म्हणतात.

'कोणा भजती कोठे रहाती उदार कशावर ते भरती । शेती अथवा देणे घेणे वा किमयेला ते करिती' अथवा बांधुनी मठमठि ग्रामी शिष्यशिष्यिणी भोंदीती। दासगणु म्हणे शोध करावा प्रत्येकाने याच रिती । 'जालंदर' आख्यानात अशाच तऱ्हेने मैनावती आपल्या नोकराला आज्ञा करिते.

'दिनचर्या बघ याची मागे मागे फिरून गुप्तपणे। भाऱ्याचे काय करी वसत कुठे काय खातसे खाणे' तसाच काही प्रकार याठिकाणी संभवत असावा सन १८९४ पूर्वी दादा शिर्डीस दोन तीन वेळा तरी जाऊन आले असावेत असे समजण्यास आधार आहे. परंतु श्री चांदोरकरांनी दादांचा बाबांशी परिचय करून दिल्यानंतर व संतचरित्रे लिहावयास लागल्यापासून त्यांचे बाबांकडे जाण्याचे प्रमाण वाढले. बाबा त्यांना "नोकरी सोडून दे रे गणू. आपण बूट पुसावयास जन्मास आलो काय? आपण कोणाचे नोकर होऊ नये" असा सारखा आग्रह करीत व दादा राजीनामा देण्याचे टाळीत. या ग्रहामुळे ते शिरडीस जावयासही चुकवू लागले होते. परंतु बाबांच्या कृपेने परंतु अनिच्छेने शेवटी दादांनी नोकरीचा राजीनामा दिला. श्रीवामन शास्त्रयांनीही गुरुपदेश देताना "तुझ्या नोकरीचीच मी गुरुदक्षिणा घेणार आहे" असे म्हटले होते ते अशारीतीने खरे झाले. राजीनामा दिल्यानंतर दादा शिर्डीतच दोन तीन वर्षे राहिले. त्यामुळे बाबांच्या सहवासाचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला व त्याची परिणती अंतःकरणाच्या एकनिष्ठतेत झाली निष्ठेची प्रगति क्रमशःच होत जावी म्हणजे मागाहून पश्चात्तापाची पाळी येत नाही. बाबांच्या बाबत आपण काय करू व किती करू असे दादांना होत असावे. कोणत्याही प्रकरणाच्या नमनात बाबांचे नाव हटकून असावयाचेच कीर्तनापूर्वी आपल्यासमोर बाबांचा फोटो ते ठेवीत असत. कीर्तनारंभीच 'रहम करो अब मोरे साई' व 'साई रहम नजर करना' अशी दोन पदे असावयाचीच दादांनी महिपती नंतर होऊन गेलेल्या पुष्कळच संतांची चरित्रे बाबांच्या अनुज्ञेप्रमाणे त्या त्या

ठिकाणी जाऊन माहिती मिळवून लिहिली. ती सर्व 'भक्तलीलामृत' 'संतकथामृत' व 'भक्तिसारामृत' या तीन खंडात ओवीबद्ध केली आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या तिन्हीही खंडात त्यांनी बाबांच्या चरित्राकरिता काहीना काही तरी जागा दिली आहेच, या तीन खंडात बाबांच्या चरित्राने जितकी जागा व्यापली आहे तितकी इतर कोणत्याही संताच्या वाट्याला आलेली नाही. आपल्या आराध्य देवतेला निवडून फूल वहाण्याचाच हा प्रकार आहे. दादांनी बाबांना केलेली पुढील विनंति बघण्यासारखी आहे. ते म्हणतात,

'माझे गुरु मरून गेले । पोरकेपण मजला आले ।
म्हणून पाहिजे सांभाळिले । या पोरक्या गणूसी ॥
तुम्ही एकरूप अवघे संत । तुम्हापासी नव्हते द्वैत ।
तुम्ही वामनशास्त्री साक्षात् । आहात बापा मजलागी ॥

श्रीवामन शास्त्र्यांनी सांगितल्याप्रमाणे दादांनी आचरण केले. बाबांची अनुज्ञा ते मोडत नसत. त्यांच्याच आज्ञेने त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला, संत चरित्रे लिहिली, नारदीय पद्धतीचे कीर्तन करण्यास सुरवात केली, रामनवमीच्या प्रतिवर्षीच्या उत्सवात शिर्डीस कीर्तन करावयास सुरवात केली, मराठवाड्यात जाऊन कार्य करणे सुरू केले. त्यांच्या दृष्टीने बाबा हे त्यांचे सर्वस्व होते. दादांनी केलेल्या पुढील काही काव्यपंक्तीतून त्यांच्या भावनेचे यथातथ्य जरी नाही तरी ओझरते दर्शन होईल, कारण भावना मूक असतात. त्या यथार्थ वर्णन कसे करणार।

'कमलोद्भव, कमलाकर, शिवहर त्रिगुणात्मक मूर्ति ।
तूचि होऊनी साई समर्था विचारसी भूवरती ॥'
।अधिकार साईबाबांचा । शुक वसिष्ठ जैमिनीपरी ॥
। हे चालते बोलते ब्रह्म । सकळ सुखाचे सौख्यधाम
निजभक्ताचे अवघेश्रम । कृपाकटाक्षे निवारती ॥
। जय जयाजी महाराज जय-जय गुरु बाबा साई ।
परब्रह्म अवतार तू या शतकाच्या ठायी ॥'
। शिरडी माझे पंढरपूर । साईबाबा रमावर ॥
।साई महाराज ज्ञान गभस्ती । ज्ञानांवरी उदेला ॥
। नरदेहधारी परमेश्वर । तू ज्ञान नभीचा दिनकर ।
तू दयेचा सागर । भवरोगा औषधी तू ॥ '
बाह्य कृतीवरून । जरी म्हणावे सामान्य ।
तरी शुद्धजे अपरोक्ष ज्ञान । तेही तेथे पाणी भरी ॥

जरी म्हणावे भिकारी । तरी लक्ष्मी बरीक ज्याच्या द्वारी ।
जरी म्हणावे श्रीमंत भारी । तरी पोट भिक्षेवर ॥

दादांनी बाबांच्यावर दोन तीन भूपाळया केल्या आहेत तसेच त्यांची एक आरतीही केली आहे. 'साईनाथ स्तवन मंजिरी' या नावाचे १६२ ओव्यांचे एक स्तोत्र केले आहे. त्यातील गोदावरीवर केलेले रूपक फारच मनोरंजक आहे. संतत्वाची गोदावरी वहात आहे. आणि प्रत्येक शतकात होऊन गेलेले संत हे जणु तिला आलेला पूर आहे. वसिष्ट, नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, तुळशीदास कबीर हे जणु गोदावरीला आलेल्या पुरासारखे आहेत. तसेच सांप्रत साईबाबाही हे त्या गोदावरीला आलेला पूर आहेत. ही कल्पनाही मोठी भव्य आहे 'ज्ञानेश्वर' आख्यानातील भोवऱ्याचे रूपकही तितकेच उदात्त आहे. ते रूपक असे.

'खेळु पोरा रे चाल पोरा । अपरोक्ष ज्ञान भवरा ।
याला वैराग्याची अरी । जाळी भक्तीची साजिरी ।
भावे फेकु हा गरगरा ॥ खेळु पोरा'
या भवऱ्याचा रंग । आहे अक्षय अभंग ।
भवि बुडविल तुज ना जरा ॥ खेळु पोरा ॥
याला गुच्च्याची ना भिती । नादे कळेल आत्मज्योती ।
रिंगण ब्रह्मांडाचे करा ॥ खेळु पोरा ॥
गणु म्हणे ऐसा भोवरा । पाहिला मी साई करा
पहा शिरडीत जाऊन जरा ॥ खेळु पोरा ॥

असे निरनिराळ्या प्रकारांनी बाबांच्या विषयीचे प्रेम त्यांनी व्यक्त केले आहे.

उगवत्या सूर्याला नमस्कार या कोटीतील दादांचे वागणे नव्हते. श्रीसाईबाबांचे १९१८ साली दसऱ्यास निर्याण झाले. वैकुंठात गेल्यानंतर बाबांचे स्वागत कसे झाले याचे मोठे बहारदार वर्णन भक्तिसारामृताच्या त्रेपन्नाव्या अध्यायात दादांनी केले आहे. ते म्हणतात.

'श्रीहरीच्या शेजारी । बाबा बसले आसनावरी ।
त्यांच्या चरणाबद्ध करी । नमन माझे हे असो ।
ही वैकुंठीची हकीकत । म्या पाहिली स्वप्नात ।
म्हणून कथीली तुम्हाप्रत । तीच या समयाला ।'

स्वप्न रंजन म्हणून या वर्णनाकडे पाहिले जाईल, परंतु तुकाराम महाराज्यांच्या स्वप्नात जसे पांडुरंग व नामदेव आले यावर आपण विश्वास ठेवतो. त्याच प्रकारची श्रद्धा दादांच्याही सांगण्यावर ठेवण्यास प्रत्यवाय नसावा. बाबांची पुण्यतिथी दरवर्षी

दादा पंढरपुरास साजरी करीत. त्यानिमित्त सात आठ ब्राह्मण बोलावून त्यांचे द्वारा देवावर पद्मान व रुद्राचा अभिषेक करीत, शिव विष्णु सहस्रनामाच्या उच्चारासहित हजार बेल व तुळशी वाहिल्या जात व मग समाराधना होई. त्यानिमित्त सात आठशे पान होई, १९४२ सालापासून अन्न धान्यावर नियंत्रणे आल्यावर त्याचे प्रमाण कमी पडले. त्यानंतर प्रत्येक मठात तन्निमित्त फळाचे वाटप करण्यात येई. दादांनी कार्यवाहीत आणलेले हे सर्व कार्यक्रम अद्यापही त्यांचे उत्तराधिकारी श्री. अनंतराव आठवले हे तितक्याच निष्ठेने पार पाडीत असतात. त्यात दसऱ्यास फळे वाटण्याचा कार्यक्रम अंतर्भूत आहे हे सांगणे नको. उलटपक्षी बाबांचेही दादांच्यावर अलोट प्रेम असे. कीर्तनासाठी शिरडीस आल्यावर दादांना परत जाण्याकरिता दोन दोन महिने परवानगी मिळत नसे. अशी आठवण सांगतात की बाबा कधी कधी फारच रागवत त्यावेळी त्यांच्याजवळ जाण्याची कोणाचीही छाती नसे परंतु दादांना पाहताच बाबा शांत होत व त्यांच्याशी बातचीत करू लागत. या प्रकारावर 'दासगणू हे बाबांचे जणू प्रल्हादच होते' असे श्री. अ. दा. आठवले म्हणत.

## श्रीसाईबाबांचा पूर्वेतिहास

श्री. दासगणू महाराजांनी भक्तीसारामृतांच्या सव्विसाव्या अध्यायात गोपाळमहाराज शेलूकरांची माहिती दिली आहे. हे गोपाळमहाराज म्हणजे बाबांचे गुरु होत. शेलू गाव हे परभणी जिल्ह्यात जिंतूर परगण्यात आहे या गोपाळमहाराजांचे वडील केशवराव वत्सगोत्री अश्वलायन शाखेचे पंचप्रदरी असे सदाचरणी ब्राह्मण जांबवावी गावात रहात असत. ते व्यंकटेशाचे भक्त होते. त्यांना मूलबाळ नव्हते. त्यांची भक्ती पाहून व्यंकटेश केशवरावांचे स्वप्नात आले व म्हणाले 'जगदुद्धारासाठी। पूर्वकालीचे ज्ञानजेठी। रामानंद तुझ्यापोटी। येतील काशी क्षेत्रीचे।' त्याचप्रमाणे, हे गोपाळमहाराज केशवरावांचे पोटी जन्मास आले. जांबवावी हे गाव सोडून गोपाळमहाराज शेलवाडी (शेलू) येथे आले व ते तेथे पुढे जमेदार झाले. एकदा आपल्या वाड्याच्या तटावरून त्यांनी एक ठसठसित बांध्याची शूद्र स्त्री शौचाला बसलेली पाहिली व त्यामुळे त्यांचे मन विचलित झाले. त्याचे प्रायश्चित म्हणून त्यांनी स्वतःचे डोळे दाभणाने फोडून टाकले. गोपाळमहाराजांचा स्वभाव उदार होता. हा त्यांचा लौकिक ऐकून एक फकिराची बाई आश्रयासाठी त्यांच्याकडे आली. दासगणू त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे करतात.

'असो एके दिनी फकिराची। कांता आली मानवतीची।  
कथा ऐका तियेची। श्रोते परमादराने॥  
त्या स्त्रीचे अंगावर। होते जीर्ण वस्त्र साचार।  
ठिगळालागी नव्हता पार। चोळी तशीच फाटकी॥

वयाने वृद्ध म्हातारी । होती पन्नाशीच्या वरी ।
बाणा अवघा फकिरी । बगलेत झोळी तुकड्याची ।
हिरव्या बांगड्या हातात । पाठीशी घेतला सुत ।
जो पूर्वीचा कबीर सत्य । वयाने पाच वर्षाचा । '

त्या बाईला आश्रय दिल्यामुळे घरच्या माणसात फारच असंतोष पसरला, व त्या मुलाचा काटा काढण्याकरिता प्रयत्न सुरू झाले. गोपाळ महाराज त्या मुलाला घेऊन अरण्यात जात असत. कदाचित् घरचा त्रास चुकविण्यासाठी जात असावे अथवा काही भविष्यकाल त्यांच्या लक्षात आला असून त्या मुलाला विशेष तयार करण्यासाठीही ते तसा एकांत शोधत असावेत. तेथेही त्यांच्या घरच्या माणसांनी त्या दोघांचा पिच्छा सोडला नाही. एकदा अरण्यात त्या मुलाला मारण्यासाठी जो धोंडा मारला तो गोपाळ महाराजांना लागला. त्याच क्षणी गोपाळमहाराजांनी नजिकच्या भाकड गाईला दूध आणवून ते त्यांनी त्या मुलास ( साईबाबास ) प्यावयास लावले त्यानंतरची हकीगत दादांनी पुढीलप्रमाणे वर्णन केली आहे. गोपाळ महाराज म्हणतात.

'बापा तुवा हे दूध प्यावे । ये देशी मुळी न रहावे ।
पश्चिमेशी गमन करावे । लक्षून दक्षिण गोदातीर ।
डोईचे फडके सोडले । ( जखमेवर हे बांधले असावे )
त्याचे मस्तकी बांधले । या फडक्याने मी आपुले ।
दिले सर्वस्व आज तुला ॥
मला वाटते शिरडीचे । समर्थ साईबाबासाचे ।
तेच हे पोर फकिराचे । असावे की निःसंशय ॥ '

गोपाळ महाराजांनी आपले धोतर त्या मुलाच्या अंगावर फेकले व त्याचीच त्यामुलाने कफनी केली. साईबाबा आपल्या उशाला एक वीट घेऊन निजत. त्या विटेवर गोपाळ महाराजांनी आपले पाय ठेवले होते व त्यामुळे ती वीट बाबांना फार प्रिय असे. त्यासंबंधी दासगणूनी केलेले वर्णन पुढीलप्रमाणे आहे. त्यात बाबा चांदोरकरांना सांगतात.

'ही वीट सद्‌गुरुची । माझ्या आहे देणगीसाची ।
बापा योग्यता इयेची । थोर आहे ब्रह्मांडाहून ॥
ही वीट माझे ध्येय ध्यान । ही वीट माझी प्रत्यक्ष प्राण ।
ही भंगल्या प्रमाण । केलेच पाहिजे मजलागी ॥
मी मम गुरु समवेत । जेव्हां होतो काननात ।
त्या परभणी जिल्ह्यात । आसमंतात भागी शेलूच्या ॥

ते कित्येक दुष्टांनी । विटे धोंडे फेकले जाणी ।
आम्हा उभयता लक्षूनी । प्राण घेण्या कारणे ।।
मला जो धोंडा मारला । तो गुरूच्या मस्तकी लागला ।
गुरूस होता प्रहार केला । ज्या विटेने तीच ही ।।
परी गुरुचे कौतुक अघटित । वीट राहिली अधर सत्य ।
एक प्रहर पर्यंत । तीच बापा वीट ही ।
धोंडा जो का लागता । तोही अधर असता राहिला ।
परी तो माझ्यासाठी आला । हे ध्यानांत असू दे ।।
म्हणूनी न राहिला अधर । करावया आला प्रहार ।
परी सद्‌गुरुने आपले शिर । माझ्यासाठी दिले त्या ।।

सदर ५३ व्या अध्यायातील वर्णन २६ व्या अध्यायाशी मिळते जुळते आहे. श्रीदासगणूंनी अशा तऱ्हेने बाबांच्या पूर्वायुष्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### श्री साईबाबांचा मोठेपणा

सामान्य माणसाला आपल्या आवाक्याबाहेरच्या इच्छेची पूर्ती करून देणारा कोणी भेटला की त्याला तो मोठा वाटतो व त्यामुळेच असा कोणी चमत्कार करणारा भेटला की त्याचे श्रद्धाळू मन त्यातच गुंतून जाऊन खरा मोठेपणा त्याला कळेनासा होतो. चमत्काराना दासगणूंच्या ठिकाणी थारा नसे हे प्रसिद्ध आहे. मद्रास प्रांतात बाबांच्या कार्याचा प्रसार करणारे श्री. नरसिंह शास्त्री यांनी १९४७ साली कोइमतूर येथे साई भक्ताचे संमेलन घडवून आणले. त्याचे अध्यक्ष म्हणून श्रीदासगणू महाराजांची नियुक्ती झाली होती. परंतु संमेलनात खऱ्या विषयाचा विचार होण्या ऐवजी प्रापंचिक परिहाराकरता काय करावे या प्रश्नांचा भडिमार दादांच्यावर झाला 'श्रद्धा ठेवा' 'नामस्मरणकरा' असे उपाय सांगूनही उपस्थितानां पटेनात. शेवटी दादा कंटाळले व त्यांनी आपली नापसंतीही संयोजका जवळ व्यक्त केली. थोडक्यात अशा चमत्कारा विषयी अनुकूल नसणाऱ्या दासगणूंनी बाबांच्या बाबतीत त्यांच्या चमत्कारांचे बरेचसे वर्णन का केले असावे असा प्रश्न निर्माण होतो. त्याचे उत्तर म्हणजे चमत्कारांच्या जंजाळा पलीकडे जाऊन दादांनी बाबांची योग्यता जाणली होती, व बाबांनी चमत्कार केले म्हणण्यापेक्षा त्यांच्या हातून ते सहजपणाने घडले म्हणणेच योग्य ठरेल. संताना चमत्कार करण्याचा निषेध असला तरी एकदा दूरवरचा इष्ट परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीनेही त्यांना धक्का प्रयोग करणे आवश्यक ठरते व तसे प्रयोग बाबांनी दासगणूबाबत केले आहेत. मला वाटते की दादांनी हे बाबांच्या चमत्कारांचे चविष्ट वर्णन केले आहे ते चमत्कारांचे कौतुक करावयाचे म्हणून केले

नसून आपल्या गुरूंचा मोठेपणा पाहून त्यांच्या झालेल्या अनावर भावनांचे ते एक प्रकटीकरण असावे.

## श्रीसाईबाबांचा हितोपदेश

बाबांनी प्रकट अशी प्रवचने व कीर्तने केल्याचे आढळून येत नाही. तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'सहज बोलणे हितोपदेश' असा त्या उपदेशाचा प्रकार असे. कै. दाभोलकर साईसच्चरित्रात त्यांच्या उपदेशाच्या पद्धतीचे पुढीलप्रमाणे वर्णन करतात.

'आकारे सूत्रमय अतिलहान । अर्थ गांभिर्यें अति गहन ।
व्यापकत्वे बहु विस्तीर्ण । संकीर्ण तरी तितुकेची ।।
ऐसे ते बाबांचे बोल । अर्थ तत्वे अति सखोल ।
कल्पांतीही नव्हती फोल । समतोल आणि अनमोल ॥ (अ. १३)

श्रीदासगणूनीही त्यांच्या पद्धतीचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे.

'एक क्षुल्लक गोष्ट घेऊन । बाबांनी करावे भाषण ।
आणि प्रश्न कर्त्याचे अज्ञान । समूळ करावे नाहीसे ।।
ही उपदेशाची हातोटी । दुजास साधणे कठिण मोठी ।
भूतमात्रा विषयी पोटी । दया अलोट वसतसे ।। '

श्रीसाई महाराजांच्या असणाऱ्या भक्तात त्यावेळचे नगराच्या कलेक्टरचे चिटणीस श्री. नानासाहेब चांदोरकर यांचा नंबर बराचसा वर लागतो. त्यांनी बाबांना वेळोवेळी विचारलेल्या शंकांचे निरसन कसे केले आहे याचे सविस्तर वर्णन श्रीदासगणूंनी 'संतकथामृताच्या' ५७ व्या अध्यायात व भक्तिलीलामृताच्या बत्तिसाव्या अध्यायात केले आहे. श्री. चांदोरकरांनी बाबांना विचारलेले काही प्रश्न पुढील प्रकारचे आहेत. 'परमेश्वर कोण कसा व कोठे आहे.' 'शुद्ध चैतन्य म्हणजे काय ?' 'आत्मा व चैतन्य एक कसे' 'माया ब्रह्म एक होऊन ही ब्रह्मांडाची उत्पत्ति झाली तर ही माया कोठून आली ?' यांची बाबांनी दिलेली उत्तरे येथे दिल्यास फारच विस्तार होईल. ती उत्तरे त्या अध्यायातच वाचकांनी पहावीत. सर्वसाधारण माणसाला व्यवहारात उपयोगी पडणारे एक दोन प्रश्न व त्यांची बाबांनी दिलेली उत्तरे सर्वांनी आपल्या जीवनात अनुभवून पाहण्यासारखी आहेत.

**प्रश्न एक** — संसारात कसे असावे ?

उत्तर — आलेल्या परिस्थितीमध्ये आनंद मानून रहावे. खोटी तळमळ करू नये. संपत्ती असली तरी लीन असावे. कोणास छळू नये. परंतु दुष्ट व दुर्जन यांना

ओळखावे. साधुसंतांचा मान ठेवावा आपल्या प्राप्तीकडे पाहून दानधर्म करावा. कर्ज काढून उधळेपणा करू नये, शरिराला जशी पित्ताची आवश्यकता असते तशी प्रपंचात धनाची असते. कृपण नसावे उदार असावे पण उधळेपणा नसावा. प्रवासी, तापसी, संन्यासी भिक्षामागून विद्यार्जन करणारा, यांना अन्नदान द्यावे, सत्तेचा दुरुपयोग करू नये. पोषाख भडक असू नये. नोकरांना प्रेमाने वागवावे. मुलाबाळांस कर्तव्यबुद्धीने शिक्षण द्यावे पण त्याचा अहंकार नसावा. कर्तव्य आपण करावे त्याचे श्रेय ईश्वराला द्यावे. अंगी कर्तृत्व असावे. निर्माल्यासारखे नसावे. उत्तम कार्य हाती घेऊन तडीस न्यावे वगैरे.

**प्रश्न दोन** — मुक्तस्थिति येण्यास काय करावे ?

उत्तर — आपले प्रारब्ध भोगताना विवेक व नीति कायम ठेवावी. सज्जन संगत धरावी. अभक्ष भक्षण करू नये. वितंडवादी नसावे खोटे वचन कोणालाही व केव्हाही देऊ नये. स्वस्त्रीशी संग परंतु तोही परिमित असावा षड्रिपु आज्ञेत असावेत. आई वडील व ज्ञानी यांचा मान राखावा. पत्नीस प्रेमाने वागवावे व तिचा गृह-कृत्यात सल्ला घ्यावा. कोणाचा द्वेष करू नये. मन स्थिर ठेवावे श्रवण मनन ध्यान या करिता अध्यात्म ग्रंथांचे अवलोकन करावे. मरताना कोणाचीही आस न धरता परमेश्वर आठवावा वगैरे.

श्री दासगणूंची बाबांविषयी काय धारणा होती ती त्यांनी थोडक्यात पुढील प्रमाणे व्यक्त केली आहे.

> ‘पुण्य पुरुष बाबा साई । साक्षात्कारी होता पाही ।
> त्याचा अधिकार कथू काई । कबीर अवतार प्रत्यक्षतो ।
> त्यांनी मम कविते लागून । परमार्थाचे लावले वळण ।
> नाना यत्ने करून । माझी नौकरी सोडविली ’ ।।

श्री दासगणूंच्या दृष्टीकोनातून दिसणारे बाबा हे असे होते.

“ ॐ तत्सत् कृष्णार्पणमस्तु ”

**एक माहिती पूर्ण लेख**

# हरि : ॐ आश्रम–मौन मंदीरे

—ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
१।१४ फाईव्ह स्टार अपार्टमेंट्स
बंड गार्डन रोड, पुणे–४११००१

● मी स्वतः गेल्या वर्षी ११-११-७९ ते १८-११-७९ एक आठवडा वरील आश्रमांपैकी गुजरातेतील सुरत शहरा-जवळील आश्रमातील मौन मंदीरात राहून आलो व मला त्यापासून शारिरीक व आध्यात्मिक खूपच फायदा झाला. म्हणून श्रीसाई लीलेच्या वाचकांकरिता त्याविषयी माहिती या लेखात देत आहे.

हरि : ॐ आश्रमांची स्थापना गुजरातेत नुकतेच होऊन गेलेले महान् संत पूज्य श्री. मोटा (१८९८–१९७६) यांनी केली. त्यांना स्वतःला त्यांच्या साधनेच्या काळात एकांतवास व भोजनाची व्यवस्था मिळविण्यासाठी फार त्रास पडला म्हणून त्यांनी अद्यावत् सोईसह पूर्वीच्या काळच्या जणु काय गुंफाच या मौन मंदीरांच्या रूपाने उभ्या केल्या.

आश्रमात प्रत्येक साधकाला एक स्वतंत्र खोली मिळते. त्याला लागून स्वतंत्र न्हाणी घर व संडास असतो व २४ तास नळाच्या पाण्याची सोय असते खोल्या चांगल्याच मोठ्या (१०'×१२' ते २०'×२०') असून त्यात एक पलंग किंवा झोपण्यासारखा कठड्याचा झोपाळा, एक लिहावयाचे टेबल (टेबल लॅम्प सह) एक आराम खुर्ची, एक पूजेसाठी व जपासाठी मोठा पाट व इष्टदेवतेचा फोटो वगैरे ठेवण्यासाठी स्टूलही असते पलंग. झोपाळा व पूजेच्या पाटावर खाली व मागे टेकायला अभ्यासह गाद्या असतात. सर्व ठिकाणी वीजेच्या दिव्यांची सोय असते. वाचायला गुजराती भाषेत धार्मिक पुस्तकेही ठेवलेली आहेत व पूज्य श्री. मोटा यांचा फोटोही असतो. एकूण खोलीत राहण्याची सोय उत्तम असते.

मात्र सर्व दारे खिडक्या बंद असतात. एक मौन मंदीर तर तळघरातच आहे. ज्यात मी स्वतः राहिलो होतो. परंतु मला कधीच कोंडल्यासारखे वाटले नाही. जरूरी पुरती हवा येण्याची सोय केलेली असते. आपल्या मुक्कामाच्या काळात बाहेरील जगाशी कोणताही संबंध नसतो. एवढेच काय दुसऱ्या कोणाही व्यक्तीचे दर्शनही साधकास होऊ नये अशाच रितीने सर्व सोयी केलेल्या आहेत. दोन्ही वेळेचा चहा व जेवण एका खिडकीतून तुम्हांस दिले जाते. परंतु त्या खिडकीला एक बाहेरून व

एक आतून असे दोन दरवाजे असतात. आश्रमातील माणूस बाहेरचा दरवाजा उघडून जेवण किंवा चहा ठेवून 'हरिः ॐ' असे मोठ्याने म्हणतो व बाहेरील दरवाजा बंद करतो. मग साधकाने आतील दरवाजा उघडून आपले जेवण किंवा चहा काढून घ्यायचा व तो बंद करायचा. याशिवाय या खिडकीचा उपयोग धुण्याचे कपडे, एखाद्या निरोपाची चिठ्ठी वगैरे धाडण्यास/घेण्यासही होतो. खास निकडीच्या जरूरीसाठी (Emergency) आश्रमातील चालकाना बोलावण्यासाठी वीजेच्या घंटीची पण सोय केलेली आहे. बिछान्याच्या चादरी व अभ्रे पूजेच्या पाटाच्या गादीचे अभ्रे व अंगावरचे कपडे रोजच्या रोज धुवून मिळतात. आंघोळीसाठी गरम पाणी ही मिळते.

मौन मंदीरात असताना साधकाला कसे व कोणते साधन करायचे याचे काहीही बंधन नाही. एकांतात अगदी मौन पाळणे, ध्यान व जप करणे, किंवा मोठ्याने नामस्मरण व भजन करणे, किंवा स्तोत्रे म्हणणे यातील काहीही तो करू शकतो. पूज्य श्री मोटांचा फोटो तिथे असतो परंतु साधकास वाटल्यास तो ठेवावा किंवा तो दूर करून आपल्या इष्ट देवतेचा फोटो किंवा मूर्तीही ठेवता येते. कुठल्याही धर्माला आडकाठी नाही. मात्र मंदीराचे पावित्र्य सांभाळणे, फक्त शाकाहार करणे व धूम्रपान अजिबात न करणे याबद्दल कडक नियम आहेत.

आश्रमातील जेवण साधेच पण सात्वीक असते (भाकरी, भाजी, आमटी भात–मिरची मसाले कमी). चहा व जेवण अगदी वेळेवर व गरम मिळते. मौन मंदीरातील दिनचर्या साधारण अशी :—

सकाळी ३-३० ते सकाळी ४-३०:–उठणे, मुखमार्जन करून धुण्याच्या चादरी व कपडे खिडकीत ठेवणे मौन मंदीर झाडून साफ करणे, न्हाणीघर व संडास साफ करणे.

सकाळी ४–४५ चहा
सकाळी १०–०० जेवण
दुपारी १–४५ चहा
संध्याकाळी ५–०० जेवण

या शिवायचा सर्व वेळ साधकाच्या हाती असतो. कसलाही अडथळा नसतो. रात्री केव्हाही झोपता येते. दिवसा न झोपण्याबद्दल विनंती असते. आपली खोली, न्हाणीघर व संडास वगैरे व तसेच आपली ताटवाटी व चहाचा कप इत्यादी स्वतः साफ करण्याने एक प्रकारचे स्वावलंबत्व येते व स्वतःचे काम स्वतः करण्याची संवय बढते. वीजेच्या दिव्यांची सोय आहे तरी शक्य तो साधकास खोलीत अंधार

ठेवण्याची सूचना असते. अध्यात्मिक साधनेला अंधारच पोषक असतो व एक वेगळाच अनुभव देत असतो. खोलीत वीजेचा पंखा नसतो–मुद्दाम ठेवलेला नाही. पंख्या शिवाय राहणे हे एक प्रकारचे तपच असते–अनुभवी साधकांचे म्हणणे आहे की भर उन्हाळयातही प्रथम एक दोन दिवस गरम होते परंतु नंतर संवय होते व उकाडा वाटत नाही.

मौन मंदीरात ७, १४, २१ दिवस किंवा त्याहून जास्तही राहता येते. परंतु सुरवातीला संवय होण्यासाठी व अनुभव घेण्यासाठी कमीत कमी ७ दिवस राहिलेले बरे. मौन मंदीराच्या खोलीचे भाडे (जेवण, चहा व इतर सोईसह) दर दिवसाला सध्या फक्त रु. ५ (पाच) आहे. मौन मंदीरात राहण्यासाठी बरीच मागणी असल्याने साधकाने आश्रमाकडून उपलब्ध तारखा मागवून त्याप्रमाणे आधी पैसे भरून आरक्षित करून घ्यावे. एकाच खोलीत एकाच व्यक्तीला राहता येते. काही जोडपी पण येतात परंतु त्यांना वेगवेगळ्या खोल्या देण्यात येतात. मंदीरात रविवारी सकाळी ६ ते दुसऱ्या रविवारी सकाळी ६ वाजेतो राहण्याचे असते. साधकाने मौन मंदिरात बसायच्या आदल्या दिवशी म्हणजे शनीवारी संध्याकाळपर्यंत आश्रमात पोहोचायचे असते. त्या दिवशीच्या रात्री झोपण्याची व्यवस्था आश्रम मौन मंदीरा बाहेर वेगळी करते.

पूज्य श्री मोटा यांनी असले आश्रम भारतात तीन ठिकाणी स्थापिले आहेत–

१ कुंभकोणम्–(तामीळनाडु मध्ये कावेरी नदीच्या काठी)

२ नडीयाद–(गुजरातेत शेटी नदीच्या काठी)

३ कुरुक्षेत्र जहांगीरपुरा–(गुजरातेत तापी नदीच्या काठी)

मी स्वतः कुरुक्षेत्र जहांगीरपुरा येथील आश्रमात गेलो होतो व तो महाराष्ट्रापासून जवळ आहे म्हणून त्या आश्रमाचा पत्ता व कुणाशी संपर्क साधायचा ते खाली देत आहे. पत्र व्यवहार हिंदीत किंवा इंग्रजीतून केल्यास बरेः–

श्री व्यवस्थापक, हरिः ॐ आश्रम कुरुक्षेत्र
जहांगीरपुरा सुरत–३९५००५ (गुजरात)

हा आश्रम सुरत स्टेशनपासून ६ मैल दूर आहे. स्टेशनपासून भाड्याची रिक्षा मिळते. तसेच स्टेशनपासून जहांगीरपुराची बसही मिळते. (मात्र जहांगीरपुरापासून आश्रमाकडे ४ फर्लांग चालावे लागते. अडाजण डेपोपासून बरियावची ST बस घेतली तर ती मात्र आश्रमाच्या जवळून जाते व थांबतेही.

मला स्वतःला तर या मौन मंदिरात राहून आल्यापासून खूपच फायदा झाला. सात्वीक व साधे अन्न व मनाची शांति यामुळे एक आठवड्याने बाहेर आल्यावर

शरीर अगदी हलके, निकोप व काहीसे तेजोमय भासले, मौन मंदीरात पूर्वीच्या अनेक साधकांच्या निवासाने एक प्रकारचे पावित्र्य आलेले असते व त्यात पूज्य श्री मोटा सारख्या संतांचा सूक्ष्म निवास व आशिर्वाद असल्याचा भास होतो. त्यातून माझ्या समोर तेथे श्री साईबाबांचा फोटो मी ठेवल्याने जणु काय बाबांच्या जवळच मी सतत असल्याचा आनंद होत होता. आणखी आनंदाची गोष्ट व कदाचित् वाचकाना माहीतही नसेल की पूज्य श्री मोटा याना मुक्तावस्था प्राप्त करण्यात श्री साईबाबा व श्री उपासनी महाराज यांचीच मुख्यत्वे करून प्रेरणा व सहाय्य झाले व ते त्या दोघा-नाही आपले गुरुच म्हणत असत.

एकूण ज्या साधकाना हल्लीच्या जागेच्या टंचाईमुळे संसारातून दूर राहून थोडे दिवस तरी एकांतात मनसोक्त साधना करावयाची असेल त्याकरिता हे मौन मंदीर उत्तम स्थान आहे.

[ श्री. निंबाळकर यांनी लिहिलेला श्रीसद्गुरू मोटा महाराज यांचे संबंधीचा लेख पुढील अंकी प्रसिद्ध करीत आहोत. का. सं. ]


# स्वामी कला केन्द्र

लग्न आदि मंगल कार्यांत मंगल वाद्य

शहनाई –सनई

परदेशात जाऊन आलेली एकमेव ढोलकी

शहनाई पार्टीची ( जुगल बंदी )

## आमचा खास कार्यक्रम

( दिल्ली दरबार शहनाई पार्टी शाखेचा कार्यक्रम )

पत्ता — आप्पा सामंत,
खांडके बिल्डिंग ११/२० एन. सी. केळकर रोड,
दादर-मुंबई नं. २८

# श्रीसाईबाबांची सूत्रद्वादशी

— श्री. रमेश डी. चव्हाण
साईनिकेतन, गुजरलेन,
मु. पो. ता. नवापूर, जि. धुळे,
नवापूर, पिन–४२५४१८

● श्रीसद्‌गुरु साईबाबांचे नाव ठाऊक नाही असा माणूस भारतात सापडणे कठीण. साईबाबांच्या चमत्कारांचा प्रत्यक्ष अनुभव लाभल्यामुळे भाविक भक्तांचा त्यांच्यावर परमावधीचा विश्वास जडला. मनाच्या सामर्थ्याच्या बळावर साईबाबांनी जगाला आपले अलौकिक चमत्कार करून दाखविले त्यामुळेच अंधश्रद्धाळू बरोबरच बुद्धीवादीही साईबाबांना भजतो आहे. मी मात्र भजतो आहे. त्यांची सूत्रद्वादशी वाचल्यापासून बाबांनी आपल्या सूत्रद्वादशीत म्हटले आहे ते असे—

"१) असत्य बोलू नका, सत्याची कास धरा.

२) काया-वाचा-मनाने व्यभिचार करू नका.

३) माणूस इथून तिथून एक आहे. तसाच सच्चिदानंद परमेश्वरही एकच आहे.

४) दुसऱ्याचे श्रमाचे, धनाचे, बुद्धीचे आणि भावनेचे अपहरण करू नका.

५) उपासतापासाने शरीर मारू नका, ज्याचे शरीर सुदृढ त्याचेच मनही सुदृढ असते.

६) माणसाने निर्मिलेले दुःख माणसानेच दूर केले पाहिजे; देवाने निर्मिलेल्या दुःखासाठीच देवाला हाक घालावी.

७) माणसाला 'सोऽहम'चा अहंकार अवश्य असावा.

८) स्वतःच्या मनाला विसरणाऱ्यासच दुसऱ्याचे मन जाणता येते.

९) ज्याला स्वतःचा प्रपंच आवरता येत नाही त्याने परमेश्वराच्या प्रपंचाला हात घालू नये.

१०) तुम्हाला हवा असलेला पैसा, पुत्र आणि पत्नी जिथे प्रत्यक्ष परमेश्वर देऊ शकत नाही तिथे परमेश्वराच्या दाराबाहेर उभे असलेले बुवा, बाबा आणि बैरागी कुठून देणार कपाळ!

११) या जगात आपण 'नग्न' आलो आणि या जगातून जाताना 'नग्न' होऊनच आपल्याला जावे लागणार आहे हे विसरू नका.

१२) दुसऱ्याचे दुःख जाणून ते हलके करण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी प्रार्थना करा. त्यानेच तुमचे स्वतःचे दुःख कमी होणार आहे.'

साईबाबांनी आपल्या भक्तांसाठी ही सूत्रद्वादशी सांगितली आहे. अत्यंत साधी व कोणीही आचरणात आणावी अशी ही तत्वे आपल्यापुढे बाबांनी ठेवली आहेत. ही तत्वे अंतःकरणाचा ठाव घेत खोलवर पोहचतात. अगदी सर्व प्रथम सांगितले आहे, असत्य बोलू नका व जे सत्य आहे ते कधीही सोडू नका. असत्याला कधीही जवळ फिरकू देऊ नका. असत्य सोडून सत्याप्रमाणेच वागा कारण शेवटी जय सत्याचाच होतो. कारण—

सोने मातीत पडले तरी त्याला जराही मळ चढत नाही. खरे बोलणारा व सत्याने वागणारा मनुष्य कितीही विपत्तीच्या फेऱ्यात सापडला तरी झाकणार नाही, त्याचे तेज चौफेर पसरेल आणि तो खात्रीने लोकांचे लक्ष्य वेधल्याशिवाय राहणार नाही. आयुष्यात अपयश प्राप्त होते त्याला जी अनेक कारणे आहेत त्यापैकी चांगल्या वर्तणूकीचा अभाव हेही एक कारण आहे. शरीराने, वाचेने व मनाने व्यभिचार न करता आपली वर्तणूक चांगली ठेवावी कारण चांगली वागणूक हा एक मोठा ठेवा आहे. व्यभिचारी माणसे दुःखाच्या खोल दरीत पडतात हे विसरता कामा नये.

माणूस इथून तिथून एक आहे. माणसाने माणुसकीने वागावे, एकमेकांवर प्रेम करावे, उच्चनीच भाव ठेवू नये; आपण सर्वजण एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. परमेश्वर सुद्धा एकच आहे. आपण नावे फक्त अलग अलग दिलेली आहेत. 'सबका मालीक एक' आहे ही भावना सर्वांना तारक होऊन राहणारी आहे.

सृष्टीमध्ये जे काही दिसते ते ईश्वरात व्यापिलेले आहे. त्या ईश्वराने दिलेल्या वस्तुनेच उपजीविका करावी. कुणाच्याही धनाची अभिलाषा करू नको तसेच कोणत्याही प्रकारचा मोबदला न देता दुसऱ्याच्या श्रमाचा उपभोग करणे हे मोठे पाप आहे. तसेच दुसऱ्याच्या धनाचे व श्रमाचे बुद्धीचे व भावनेचे सुद्धा अपहरण करू नये दुसऱ्याला फसवून, दुसऱ्याला अंकीत ठेवून त्याच्या अगतिकपणाचा फायदा घेणे योग्य नाही. खरंच दुसऱ्याचे श्रमाचे, धनाचे, बुद्धीचे आणि भावनेचे अपहरण करू नका. हा बहुमोल उपदेश ध्यानात ठेवला पाहीजे व त्याप्रमाणे वागले पाहीजे.

काही लोक ईश्वरप्राप्तीसाठी निरनिराळ्या साधनांचा अवलंब करतात. कित्येक योगाभ्यास करतात तर कित्येक उपास व्रते करतात पण खरे म्हणजे या उपायांनी ईश्वराची भेट होत नाही मग उपासतापासाने शरीर का म्हणून जाळायचे; उलट शरीर सुदृढ बनविणे हे प्रथम धर्मकृत्य आहे. सुदृढ शरीर असणाऱ्याचे मनही सुदृढ असते.

दुःखे कमी अधिक प्रमाणात सर्वांच्या वाट्याला येतात त्यावेळी आपले दुःख आगळे आहे असे वाटते कित्येक वेळा आपण पुष्कळसे दुःख स्वतःच ओढवून घेतलेले असते. दुःखाचा प्रसंग गुदरला म्हणजे त्यातून पार पडण्याकरिता देवाचा धावा करतो परंतु आपण निर्मिलेले दुःख आपणच निवारले पाहिजे. ज्यावेळी देवाने निर्मिलेले दुःख असेल त्यावेळीच आपण देवाला हाक घालावी.

आता 'सोऽहम' कडे वळू या. पूर्वी अशी समजूत होती की गुरूशिवाय मग तो केवढा मोठा, प्रत्यक्ष ईश्वराचा अवतार का असेना, आत्मज्ञान प्राप्त होणार नाही. या समजुतीला श्रीरमण भगवानांनी धक्का दिला. वयाच्या सतराव्यावर्षी आपण मरणार असे त्यांना वाटून त्यांचे मनात धडकी भरली. त्यावेळी 'आपले मरण पाहिले म्या डोळा। तो जाहला सोहळा अनुपम्य' हे त्यांनी प्रत्यक्ष अनुभवून आपण देह नव्हे (नाऽहम देहो) तर कोण (कोऽहम) याचा पूर्ण विचार करून आपण परमात्माच (सोऽहम) आहो असा पूर्ण व जोराचा अनुभव स्वप्रयत्नाने मिळविला. देह मातीच्या घटासारखा जड आहे. त्याला अहंबुद्धी नसते शिवाय ज्यात देहभाव नाही अशा गाढनिद्रेत आपण स्वयंसिद्ध आत्मरूपच असतो म्हणजे मी शरीर नाही तर मी कोण आणि कोठून आलो ? असा तीक्ष्ण अंतदृष्टीने शोध करीत जे आत्मनिष्ठ परायण असतात त्यांच्या हृदयात सर्वपरिपूर्ण असा अरुणाचल शिव सोऽहम स्फूर्तीने चैतन्य रूपात प्रकाशमान होतो अंतर्मुख होऊन सोऽहम म्हणजे (तो परमात्मा मी आहे) असा अनुभव येईल म्हणून माणसाला 'सोऽहम'चा अहंकार अवश्य असावा.

'सर्वांभूती पाहे एक वासुदेव । पुसोनिया ठाव अहंतेचा' नामदेव महाराजांच्या या ओळींचा प्रत्यय स्वतःच्या मनाला विसरणाऱ्यासच दुसऱ्याचे मन जाणता येते ह्यात दिसून येतो.

ज्याप्रमाणे आपल्याला भावना असतात त्याचप्रमाणे दुसऱ्यानांही त्या असतात त्यामुळे आपल्याला दुसऱ्याने त्रास दिल्यास जसे दुःख होते तसेच आपण दुसऱ्यांना त्रास दिला तर त्यांनाही दुःख होते या करिताच आपण नेहमी स्वतःचा विचार करतो तसा दुसऱ्याचाही विचार करणे आवश्यक आहे. खरा धर्म म्हणजे मन विसरून दुसऱ्यांच्या भावना ओळखायला शिकणे. इतरांचे सुख-दुख पाहणे त्यांच्याशी एकरूप होणे हे हो

आधी प्रपंच करावा नेटका या उक्तीप्रमाणे आपण आपला प्रपंच केला पाहीजे मग तो व्यक्तीचा असो की राष्ट्राचा पण प्रत्येकाने प्रपंच केला पाहिजे मात्र तो करताना कुठे फाटका दिसू देऊ नये आणि ज्याचा असा फाटका प्रपंच त्याला आवरता येत

नाही त्याने परमेश्वराच्या प्रपंचाला हात घालू नये ' प्रपंच साधूनि परमार्थाचा लाभ जेणे केला । तो नर भला रे भला हेही तितकंच खरे.

धर्मविषयक अज्ञान, श्रद्धेचे प्रतिफल मिळायची भूक, देवाविषयी अति व्यवहारी कल्पना, मानसिक अथवा शारीरिक न्यूनगंड व अपयशी जीवन यामुळे मनुष्य बुवाबाजीच्या नादी लागून इहलोकी संतती व संपत्ती विषयक समाधान लाभते काय ? तसे असते तर दुःखानी व यातनांनी तळमळणारे आत्मे क्वचितच दिसले असते. साईबाबांनी असेही म्हटले आहे की, तुम्हाला हवा असलेला पैसा, पुत्र आणि पत्नी जेथे प्रत्यक्ष परमेश्वर देऊ शकत नाही तिथे परमेश्वराच्या दाराबाहेर उभे असलेले बुवा, बाबा आणि बैरागी कुठून देणार कपाळ !

मनुष्य हा संसारात गुरफटलेला असतो. टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी तो अहोरात्र झटत असतो. पैसा सुखाचे साधन असल्यामुळे तो मिळविण्यात तो मग्न असतो. माझा संसार, माझे घर, माझा प्रपंच, माझी बायको, माझी मुले. ही जी माझे माझेपणाची हाव ती सतत मोह पाडते परंतु मनुष्य मेल्यानंतर त्यास हा मोहजाळ दूर करावाच लागतो. कोणी कोणी बरोबर येत नाही या जगात आपण 'नग्न' आलो आणि या जगातुन जाताना 'नग्न' होऊनच जावे लागणार आहे हे विसरू नका.

दुसऱ्याचे दुःख जाणून ते हलके करण्याचा प्रयत्न केला पाहीजे त्यातुन सुखाचा मार्ग शोधण्यासाठी प्रार्थना केल्यास आपोआपच स्वतःचे दुःख कमी होईल. दुःखाच्या प्रसंगी सहानुभूती, मदत फारच मोलाची असते म्हणूनच आपण दुसऱ्याच्या दुःखात धावून गेले पाहिजे म्हणजे त्याचे दुःख हलके होईल आणखी यासाठी परमेश्वराची प्रार्थनाही केली पाहिजे याने स्वतःचे दुःख निश्चितच कमी होईल.

साईबाबांनी आपल्याकडे येणाऱ्यांना व न येणाऱ्यानांही सांगितलेली ती ही सूत्रद्वादशी ही बारा सूत्रे सांगण्यासाठीच बाबा जन्मले आणि ही बारा सूत्रे आपल्या आचरणात आणीत असतानाच त्यांनी महाप्रस्थान केले. बाबांची ही सूत्रद्वादशी हृदयास जाऊन भिडणारी व प्रत्येकास विचार करावयास लावणारी आहे. आम्ही तीपासून बोध घेऊन ही बारा सूत्रे अंमलात आणली पाहिजेत कारण आपल्या जीवन कार्याच्या रूपाने शिरडीच्या ह्या थोर संतांनी आम्हाला हेच शिकविले. नैतिक किंवा अध्यात्मिक प्रश्नावर मोठमोठाली व्याख्याने व प्रवचने देत ते कधी बसले नाहीत. आपल्या साध्यासरळ वाणीने व विचारसरणीने त्यांनी आमच्या हृदयवीणेला स्पर्श केला आहे त्यातुन मधुर झणत्कार निर्माण झाला पाहिजे.

आपले कर्तव्य एवढेच कीं, श्रीबाबांवर अनन्य श्रद्धा ठेवून त्यांना शरण जाणे व स्वतःच्या कल्याणासहीत त्यास प्रार्थना करणे की,

"प्रभो साईनाथा।
सगुण निर्गुण...
विराट दर्शन...
देईमज।"

●●●


## साई गीत तुषार

भगवान श्रीसाई जीवनावर आधारीत भावपूर्ण गीते प्रत्येक गीतापूर्वी गीताची रम्य पार्श्वभूमी निवेदन. श्रीसाईलीला ऑगस्ट अंकापासून क्रमशः प्रसिद्ध होणार

कवी—श्री. सुहास महादेव देसाई
सेक्टर ६, बिल्डिंग क्र. १९०
ॲन्टॉप हिल मुंबई ४०००३७


**पुस्तक परिक्षण**

## शिरडीच्या वाटेवर

(कवी– श्री. विजय हजारे, प्रकाशक– कृपाशू प्रकाशन, सी/६ गुंफा-दर्शन, फर्स्ट कार्टर रोड, बोरीवली पूर्व मुं. ६६ किंमत दिड रुपया)

कवी– श्री. विजय दत्ताराम हजारे एम. ए. यांचा हा पहिलाच काव्य संग्रह आहे. शिरडीचे साईबाबा हे श्री. हजारे यांचे आराध्यदैवत श्री. क्षेत्र शिरडीची वारी त्यांनी अनेकदा केली. वेळोवेळी श्रीसाईबाबांच्या घेतलेल्या दर्शनाने सुखावून जाऊन व वेळोवेळी त्यांना बाबांनी दिलेल्या अनुभवा वरून प्रेरणा मिळत गेल्याने त्यांनी श्रीबाबांना वाहिलेली भाव सुमनांजली या कविता संग्रहातील ३० कवितांच्या द्वारा प्रकट झाली आहे. या काव्य गुच्छातील सगळयाच कवितांतून श्रीबाबांच्या बद्दलची त्यांची उत्कट भावना व्यक्त होते. यातील बऱ्याचशा कविता संस्थानच्या श्रीसाईलीला मासिकातून यापूर्वी प्रसिद्ध झाल्या आहेत. श्री. हजारे यांच्या हातून अशाच प्रकारे गेय व भावपूर्ण साई काव्य लेखन घडो ही शुभेच्छा.

—साईनंद

# मला भेटलेले ॥ श्री साईनाथ ॥

—सौ. कुमुदिनी यशवंत टिळक
८ लक्ष्मी निवास, आपटे वाडी
एल. बी. एस. मार्ग घाटकोपर मुं. नं. ८६

● श्री साईनाथ प्रत्यक्ष परमेश्वराचेच रुप होते. ते आपल्या भक्तांचे सदैव रक्षण करत असत. परंतु अज्ञानामुळे मला ते समजले नाही व अजूनही समजत नाही. खरोखरच संतांना ओळखण्याचे सामर्थ्य, हे काम सोपे निश्चित नाही.

मला एका कठीण प्रसंगी प्रत्यक्ष 'साईनाथांनी' येऊन साहाय्य केले. तरी मला ते प्रत्यक्ष 'साईबाबाच' होते असे मनात सुद्धा आले नाही. मी त्यांना ओळखू शकले नाही. तो प्रसंग असा.

इ. स. १९५७ साली आम्ही, मुलांना घेऊन 'पैठण मुंगी' येथे गेलो होतो. मुले लहान असल्यामुळे बरोबर बहिणीला घेतले होते. त्यावेळेस मोठा मुलगा गिरीश वय वर्षे २ व धाकटा जयंता ३ महिन्याचा होता. चि. गिरीष मुंगाई देवीच्या नवसाने झाला असल्यामुळे तिच्या पाया पडावयास गेलो होतो, व येताना आम्ही वेरुळ, अजिंठा, औरंगाबाद बघून नाशिक त्र्यंबकेश्वरला गेलो, व ह्यांना म्हटले, 'आपण आता शिर्डीला साईबाबांच्या पाया पडावयास जाऊ या.

मला लहानपणापासूनच 'शिर्डीला' साईबाबांच्या दर्शनासाठी जावयाचे होते. परंतु सौ. आईकडे असताना योग आला नाही. त्यामुळे साईबाबांच्या दर्शनाची अतिशय ओढ होती. म्हणून ह्यांना मी सारखा आग्रह करत होते. आपण काही झाले तरी शिर्डीला जायचेच.

परंतु ह्यांच्या मनात मुले लहान असल्यामुळे शिर्डीला जावयाचे नव्हते. हे म्हणाले, 'मुले दोघं लहान आहेत. त्यांना नुकत्याच गोवर, कांजिण्या येऊन गेल्या आहेत. दगदग व त्रास नको. आपल्याला मुख्य मुंगीच्या पाया पडावयाचे होते. ते झाले. तुझा तो 'घृष्णेश्वर' 'त्र्यंबकेश्वर' झालाच की आणखी काय पाहिजे ? चला घरी.

पण मला तर शिर्डीला जायचेच होते. बाबांच्या दर्शनाची तीव्र इच्छा झाली होती. हो नाही करताना शेवटी हे शिर्डीला येण्यास तयार झाले. त्यावेळेस मला झालेला आनंद अजुनही स्मरणात आहे.

अशा तऱ्हेने आम्ही, 'शिर्डीला' येण्यासाठी निघालो. आम्हाला शिर्डी गावची काहीच माहिती नव्हती. कुठे उतरावयाचे! कसे जावयाचे! काय करायचे! काहीच माहिती नव्हती.

आम्हाला सांगण्यात आले. तुम्ही कोपरगावला उतरा, तेथे तुम्हाला शिर्डीला जाण्यासाठी बस मिळेल, व त्याप्रमाणे आम्ही कोपरगावला आलो. त्यावेळेस रात्रीचे १० वाजले होते. ताबडतोब अर्धा पाऊण तासांनी शिर्डीला जाण्यासाठी बस होती. म्हणून आम्ही "कोपरगाव" बस स्टँडवरच बसची वाट पहात उभे होतो.

परंतु रात्र झाल्यामुळे, जवळ मुले लहान व शिर्डीची काहीच माहिती नाही. त्यामुळे अपरात्री जाण्यास मी खुपच घाबरले होते. म्हणून साईबाबांचा धावा मनातल्या मनात करू लागले, व तूच आता माझे रक्षण कर म्हणून प्रार्थना एकीकडे करत होते. एकीकडे भिती! एकीकडे दर्शनाची ओढ! अशा द्विधा मनः स्थितीत मी होते.

एवढ्यात एक मनुष्य माझ्या जवळ येऊन मला म्हणाला, 'काय बाई? तुम्हाला कुठे जावयाचे.' मी म्हटले, 'शिर्डीला' तो म्हणाला, 'मला पण शिर्डीलाच जावयाचे आहे. आपण एकदमच जाऊ' मी बरे म्हटले.

नंतर तो गृहस्थ मला म्हणाला, 'बाई माझी ही बॅग तुम्ही सांभाळा. मी पाच मिनिटात परत येतोच ही बॅग अतिशय महत्वाची असून त्यामध्ये खुप पैसे आहेत. माझ्याजवळ जोखीम नको. तुम्ही पाच मिनीटे बॅग सांभाळा माझा विश्वास आहे. मी ती बॅग घेतली, व त्यांची वाट पहात बसले. माझ्या मनात त्या वेळेस कुठलीच शंका वगैरे आली नाही. परंतु अर्धा, पाऊण तास झाल्यावर, जो गृहस्थ पाच मिनिटात येतो असे सांगून सुद्धा, आला नाही. म्हणून चिंता व काळजी वाटू लागली.

शिर्डीची बस येण्याची पण वेळ झालेली. ही बॅग चोरीबीरीची तर नसेल ना! अशी माझ्या मनात शंका आली. मी तर घाबरुनच गेले. केवढे संकट होते ते! मुद्देमाला सकट माझ्या हातात बॅग होती. तेवढ्यात बस आली. म्हणून आम्हाला ती बॅग कुठे टाकता येईना व लोकांना पण सांगता येत नव्हते. कारण बॅगेत काय आहे? ह्याची कल्पना आम्हास होती. त्यामुळे आम्हास काहीच करता येत नव्हते. आमच्यावर विश्वास ठेऊन ती बॅग त्याने आम्हास दिली होती. मी तर घाबरुनच गेले होते. साईबाबा! हे काय नवीन संकट आले आहे. तूच ह्यातून मार्ग काढ. असे म्हणून ती बॅग घेऊन मी बस मध्ये चढले. बस सुरू होणार इतक्यात तो मनुष्य धावत धावत बस मध्ये चढला. तेव्हा मला अतिशय आनंद झाला. मनातील दडपण दूर झाले. गाडी सुरू झाली.

मी, माझी बहिण व मुले अम्ही सगळी झोपेलाच आलो होतो. हे बघून ते गृहस्थ म्हणाले, ' तुम्ही आता झोपा. मी तुमचे सामान सांभाळतो. व ' शिर्डी ' आले की सांगतो. मला झोप येत होतीच म्हणून मी पेंगू लागले.

एवढ्यात वरती ठेवलेले एक भले मोठे बोचके माझ्या मुलांच्या अंगावर पडणार ! तर त्यांनी ते वरच्यावर झेलून धरले. तरी सुद्धा खुप मोठा आवाज झालाच. सगळी घाबरली. कुणालाच काही कळत नव्हते. सगळी झोपेमध्ये होती. त्यांना खुप लागले. ते जर नसते तर माझ्या मुलांचा नक्कीच जीव गेला असता. एवढी ती जड बोचकी होती. तरी सुद्धा ते मला काही लागले नाही म्हणत होते. संपूर्ण ओझे त्यांनी पाठीवर झेलले होते. व आपले डोकेमध्ये घालून मुलांचे रक्षण केले होते त्यांच्या मुळेच आज माझी मुले एवढी मोठी झालेली दिसत आहेत. बरे असो.

अशा तऱ्हेने शिर्डी गाव आले. त्यावेळी रात्रीचे दोन वाजले होते. अशा अपरात्री आपण आलो आहोत आता विचारावयाचे कोणाला ? मी खुप घाबरले, व माझी बहिण तर खुपच घाबरलेली होती. तीला तर भीतीने संडासलाच लागली. ती म्हणाली, ' माई प्रथम संडासला चल. मग मी त्याच गृहस्थाना म्हटले,' तुम्हाला ' शिर्डीची ' माहिती आहे ना ! मग आम्हाला संडास दाखवा.

ते म्हणाले, मला शिर्डीची चांगलीच संपूर्ण माहिती आहे. तुम्ही बिलकुल काळजी करू नका. मी तुमची सर्व सोय करतो. माझी कार्यालयात पण चांगलीच ओळख आहे तर प्रथम मी तुम्हास संडास दाखवितो. चला आम्ही गेलो. त्यावेळेस संडास खरोखरच खुप लांब होते एका बाजूला नंतर त्यांनी आम्हास १ खोली दोन दिवसांसाठी ' डिपॉझिट ' भरून घेऊन दिली. फॉर्म ह्यांच्याकडून त्यांनी लिहून घेतला. आम्हाला काही भांडी भाड्याने घेऊन दिली. ' स्टोव्ह ' रॉकेल जेवढी आम्हाला गरज लागेल तेवढे सामान त्यांनी आम्हास मिळवून दिले. कुठलीही आमची अडचण ठेवली नाही. त्यांना तर मला काहीच सांगावयास लागले नाही.

मनात आले, ह्यांची शिर्डीला चांगलीच ओळख दिसते म्हणून ही आपली कामे भरभर झाली. परंतु कर्ता करवता परमेश्वर होता. मी त्यांना ओळखूच शकले नाही. नंतर आम्ही खोलीवर आलो. त्यांनी प्रथम एका गड्याकडून खोली साफ करून घेतली. मी शेजारच्याच खोलीत रहात आहे. काही लागले तर सांगा ! काळजी करू नका ! निर्धास्त रहा. असे सांगून ते आमच्या देखतच पलीकडे गेले.

आमच्या खोलीच्या पलीकडे दोन खोल्या होत्या, व खाली जाण्यास आमच्या दारावरूनच मार्ग होता. परंतु आमच्या व त्या दोन खोल्यामध्ये एक लाकडी पार्टीशन होते. त्यामुळे शेजारचे काही समजत नव्हते- सकाळी चार वाजता ऊठून ते गृहस्थ

पुन्हा आले व म्हणाले, 'दुधासाठी भांडे द्या. मी दुध आणून देतो. एका गवळयाची व तुमची ओळख करून देतो. तुम्ही त्याच्या कडूनच दुध घ्या, मी भांडे दिले. परंतु त्यावेळेस त्याना देण्यासाठी मला पैशाचे अजिबात लक्षातच आले नाही. मी तीन शेर दुध आणावयास सांगितले. कारण त्या वेळेस आमचा गिरीश संपूर्ण दुधावरच होता. तो दुसरे काहीच खात नसे. त्यामुळे त्यांनी माझे सर्वात मोठे दुधाचे काम केले. मला दुध आणून दिले.

दुध आणून झाल्यावर मी ह्यांना म्हटले, 'आपण त्यांना आता चहा तरी करून देऊ या, व ओळख पण करून घेऊ या. खरोखरच त्यांनी आपल्यासाठी किती त्रास सोसला. त्यांच्या मुळेच मुले वाचली. आपली एवढी सोय झाली. जा, तुम्ही त्यांना घेऊनच या. मी चहा करते. म्हणून हे बोलावणे करण्यास गेले. तर दाराला कुलूप बघून आम्ही तर चकितच झालो. अवघ्या दोन मिनिटात ते गेले कुठे ! आम्हाला जाताना तर दिसले नाहीत म्हणून मी शेजारी चौकशी केली. की ह्या खोलीतले गृहस्थ कुठे गेले. ती लोकं म्हणाली, 'ही खोली एक महिना झाला बंद आहे. इथे कुणी आलेच नाही.' मला तर गंमतच वाटली, व नवलही वाटले. आता १ मिनिटापूर्वी दुध आणून दिले मग हे गेले तरी कुठे? आम्ही सगळीकडे शोध केला, व शेवटी ऑफिसमध्ये जाऊन चौकशी केली. तिथे तरी त्या माणसांशी नक्कीच ओळख असेल. परंतु त्यांनी आम्ही कोणालाही ओळखत नाही म्हणून सांगितले. तुमचे टिळकांचे 'डिपॉझिट' मिळाले आहे. भाड्यांचे पैसे मिळाले आहेत. जाताना 'डिपॉझिट' घेऊन जा! आम्ही चेहरे बघत नसतो. हे ऐकून आम्हाला खुपच नवल वाटले. तेव्हा त्यांना आम्ही झालेली सर्व हकिकत सांगितली. तेव्हा ते म्हणाले, 'इथे काही जणांना साईबाबांनी मदत केल्याचा अनुभव आहे. त्याप्रमाणे तुम्हाला पण 'साईबाबांनी' येऊन तुमची सर्व सोय करून दिली. तुम्ही भाग्यवान आहात.'

हे ऐकून मला धड बोलता पण येत नव्हते, व आनंदही प्रगट करता येत नव्हता. मी मुकस्तंभासारखी उभी राहिले. आपल्यासाठी साईबाबांनी किती त्रास सहन केला. तो एक एक प्रसंग डोळययासमोर येऊ लागला, व अजूनही येतो.

मी जेवढ्या उत्साहाने 'शिर्डीला' आले होते, परंतु प्रत्यक्ष साईबाबांच्या समाधी मंदिरात उभी राहून सुद्धा मला कशाचेच भान राहिले नाही. मी स्तब्ध हात जोडून उभी राहिले. मुलांना पण साईबाबांच्या पाया पडावयास घालण्यास विसरले. हार नाही. पेढे नाहीत. आनंद पण प्रगट करता आला नाही. नुसते साई-बाबांकडे बघत होते, व हात जोडून उभी होते.

दुसऱ्या दिवशी "साईबाबांची" मनासारखी पुजा केली. मुलांना पाया पडावयास लावले व दर्शनाचा आनंद लुटला.

खरच साईबाबांनी आमच्यासाठी किती त्रास सहन केला. आमचे 'डिपॉझीट' त्यांनीच भरले होते. त्याचे पैसे आम्हालाच मिळाले आम्हाला कुठलीही अडचण पडणार नाही अशी सोय केली व माझी शिर्डीला जाण्याची इच्छा पूर्ण केली.

खरोखरच आमचा सर्व प्रवास साईबाबांच्याच कृपादृष्टीने चांगला झाला. सदैव ते आमचे पाठीराखेच होते. त्यामुळे मला नेहमी 'ज्ञानेश्वरांच्या' अभंगाची आठवण होते—

सद्‌गुरु सारिखा । असता पाठीराखा । इतरांचा लेखा । कोण करी ॥१॥
राजयांची कांता । काय भीक मागे । मनाचिया जोगे । सिद्धी पावे ॥२॥
कल्पतरु तळवटी । जो कोणी बैसला । काय वानू त्याला । सांगाजी जो ॥३॥
ज्ञानदेव म्हणे : । तरलो तरलो । आता उद्धरलो । गुरु कृपे ॥४॥

* * *

## समर्थांचे महानिर्वाण

[ लेखक– श्री. सुरेश सातपुते, प्रकाशक– श्री. हनुमानमंदिर प्रकाशन, जाम बिल्डिंग कंपौंड, लालबाग मुंबई ४०००१२ किंमत ५ रु. पृष्ठे १०० ]

ब्रम्हीभूत श्रीसमर्थ भालचंद्र महाराजांचे एक सद्भक्त श्री. सुरेश सातपुते यांनी हे पुस्तक लिहिले आहे. समर्थांचा अखेरचा काळ श्री सातपुते यांनी पाहिलेला आहे. त्यांच्या महानिर्वाणाच्या वेळी ते जातीने हजर होते. त्या प्रसंगाचे चक्षुर्वैवर्णन त्यांनी या पुस्तकात केले आहे ते वाचून अंतःचक्षू व चर्मचक्षू अक्षरशः पाणावतात. या पुस्तकात २० डिसेंबर १९७६ ते १६ डिसेंबर १९७७ हा समर्थांचा मुंबैमधील वास्तव्याचा कालखंड श्री. सातपुते यांनी रेखाटला आहे; व तो वाचता वाचता मन हेलावून जाते. त्याचबरोबर पुस्तकात समर्थांच्या अखेरच्या काळातील आठवणी, दृष्टांत, समाधी सोहळ्याचा संपूर्ण वृत्तांत त्यांनी दिला असून महाराजांची ठिकठिकाणी असलेली मंदिरे, महामंदिरे यांचीही माहिती दिली आहे. पुस्तकात समर्थांची छायाचित्रे ही असून मुखपृष्ठावरील महाराजांचे सुंदर चित्र स्क्रीन प्रिंटींग पद्धतीने छापलेले आहे. प्रत्येक समर्थ भक्ताने आपल्या संग्रही हे पुस्तक ठेवावे अशी आमची शिफारस आहे. —साईनंद

# जिथे साईनामाचा गजर तिथे साईबाबा हजर

—श्री. विलास तुकाराम पडवळ
१७३/४ शिवनेरी, दादासाहेब फाळके मार्ग
दादर, मुंबई–४०००१४

● 'नित्य मी जीवंत जाणा हेची सत्य । नित्य घ्या प्रचित अनुभवे' । श्रीसाईबाबा अजूनही जिवंत आहेत. अनेक साईभक्तांना त्यांचे साक्षात् दर्शन होत आहे. होणार आहे. काहीना स्वप्नात तर काहीना प्रत्यक्ष सगुणात दर्शनही होते आहे. माझाही अनुभव असाच काहीसा आहे. श्रीसाईबाबांच्याच कृपेने मला काही मित्रांसोबत गेल्या रामनवमीला मुंबईहून शिर्डीपर्यंत पायी जाण्याचा योग आला. मी कसला गेलो म्हणा! श्री साईमाऊलीनेच तो योग घडवून आणला. आम्ही माणसे काय संकल्प तडीस नेणार ! करता करविता सूत्रधार तर तो साईसमर्थ ! या जड अचेतन शरीरास प्रेरणा देणारा तोच दीनदयाळ हेच खरं.

साई भरला स्थिरचरी । साई सर्वांच्या आतबाहेरी ।
साई तुम्हा आम्हा भितरी । निरंतरी नांदतसे ॥ [साईचरित्र अ. ४४ ओ १०१]

आम्ही अठराजण मुंबईहून पाडव्याच्या दिवशी संध्याकाळी दादरहून पायी निघालो. रात्रौ आणि दिवसा चालत वाटेत कुठे मिळेल तिथे थोडी विश्रांती घेत रामनवमीच्या दोन दिवस अगोदर श्रीक्षेत्र शिरडी येथे पोहोचलो. मुंबई–शिरडी हे २६६ कि. मी. अंतर चालण्यास श्रीकृपे सहा दिवस लागले. सोबतीला प्रत्यक्ष बाबाच असल्याने तसा कुणालाच त्रास झाला नाही. तुम्ही म्हणाल, कशावरून तुम्हाबरोबर बाबा होते ! तर तेच सांगतो आता.

मुंबईहून निघाल्यानंतर सहाव्या दिवशीचीच गोष्ट. आम्ही संध्याकाळी जवळ जवळ साडेसहाच्या सुमारास पोहेगावला पोहोचलो. आता शिरडीचे पायी अंतर चार पाच तासाचेच होते. त्या दरम्यान आमच्यातल्या एका मित्राच्या पायात अचानक एकाएकी कसलीशी गाठ आली आणि त्याला एक पाऊलही पुढे चालता येईनासे झाले. पाय फार ठणकू लागला. मित्राची अशी अवस्था पाहून सारेजण एका झाडाखाली बसलो आणि राईच्या तेलाने दुखऱ्या भागावर मालीश केले. पण त्याच्या असह्य वेदनांचे प्रमाण कमी होण्याची चिन्हेच दिसेनात आणि त्यामुळे त्याला बसून राहणे सुद्धा कठीण झाले. तो आम्हा सर्वांच्यामध्ये झोपूनच राहीला. प्रवासात आम्ही दुपारची मध्यान्ह-आरती आणि सायंकाळच्या सूर्यास्ताच्या वेळची धूपारती नियमाने करीत असू. रात्रौ दहाची शेजारती मात्र करीत नव्हतो. भावना वजा समजूत अशी

की बाबांना प्रवासात झोपवायचे नाही. दहाच्या नंतर रात्री देखील आम्ही चालत असू. पण अशा प्रसंगात एखादा ट्रक किंवा खाजगी गाडी मिळेल तर फार बरे होईल अशा अपेक्षेने आम्ही इकडे तिकडे पाहात राहीलो. आम्ही सर्वांनी ठरविले कि त्याला पुढे गाडीने पाठवून आम्ही इतरांनी चालत जायचे. पण हे त्याला पसंत पडेना. तो तर ओक्साबोक्सी रडूच लागला. म्हणाला, ‘ बाबांनी इथवर मला पायी आणलं आणि थोडक्या अंतरासाठी माझी कसोटी पाहताहेत, मी पायीच येणार शिर्डीपर्यंत.’ पण आम्हा सर्वांपुढे प्रश्न होता कि ह्या अवस्थेत हा पायी चालणार कसा ? पाय तर इतका जबरदस्त दुखत होता कि जणू वेदना सहन करण्याची मर्यादाच संपलेली होती. शिवाय मनाची जरी पूर्ण तयारी होती तरी शरीराची तेवढी तयारी नको का असायला ? बाबा उपाय सुचवतील तसे करायचे असं ठरवून आम्ही धूपारती सुरू केली.

आरतीला इतका काही रंग भरला की आम्ही जणू शिर्डीला बाबांच्या समाधी मंदिरातच आरती करतो आहोत की काय असं वाटायला लागलं. पोहेगावातील लोकही बाजूला जमा झाले. आश्चर्य म्हणजे आम्ही सर्वजण मोठ्या आवाजात आरती म्हणत होतो आणि आमच्यातला आमचा दुसरा एक मित्र ( दिपक नावाचा ) मात्र हाताने टाळी वाजवित पण सारखा बाबा...बाबाऽऽबाबाऽऽऽअसं म्हणत रडत होता. आम्हाला कळेना की हा आणखी काय असं करतो आहे ? आरती संपेपर्यंत हा तसंच करीत होता. डोळयातून अश्रूंच्या धारा वाढतच होत्या. दिपकने आरती झाल्यानंतर वॉटरबॅगमधील पाणी एका पेल्यात घेतलं आणि त्यात उदी घालून साऱ्यांना ते तीर्थ दिलं. सगळ्याना उदी लावली आणि आश्चर्य म्हणजेच आमचा तो मित्र ज्याच्या पायात गाठ आली होती तो पंधरा-वीस मिनिटापूर्वी असह्य वेदना होत होत्या तो उठून बसला आणि उभा राहून पाहतो तो दुखणं वगैरे अजिबात बंद झालं होतं. आणि...आमच्याबरोबर तो पूर्ववत् चालू लागला.

आम्ही मग दिपकला विचारलं कि तू असं काय ‘ बाबा...बाबाऽ...बाबा म्हणून रडत होतास ’. तर त्याने सांगितलेली हकीगत त्याच्याच शब्दात सांगतो— आरती सुरू झाली आणि आपण बसलेल्या जागी, बरोबर आपल्यामध्ये श्रीबाबा उभे राहिलेले मी पाहिले. अंगात पांढरा सदरा आणि धोतर घातलेले, गळयामध्ये ताजा टवटवीत, सुंदर पिवळया रंगाचा गोंड्यांचा फुलाचा हार घातलेले, हसऱ्या चेहऱ्याचे दाढी वाढविलेले आणि एका हाताने दहा बारा मोरांची सुंदर लांबट पीसे घेऊन आपल्या सर्वांवर फिरवित असलेले असे श्रीबाबा मी पाहिले. बोलले मात्र नाहीत. पण आरती संपेपर्यंत ते तसेच उभे होते. आणि आरती होता होताच अदृष्य झाले.’

हे सारं आम्ही दिपककडून जीवाचे कान करून ऐकत होतो. श्रीबाबांना प्रत्यक्ष पाहण्याचा सुख सोहळा फक्त त्यालाच मिळाला. खरंच बाबांना सगुण रुपात पाहण्याचा मान मिळविणारे किती भाग्यवान ! त्याला देखील पूर्वसंचिताची पुण्याइ असावी लागते म्हणा. नाहीतरी हरिनामाची आवड पूर्व संचिताशिवाय सगळ्यानाच कुठे होते. तर सांगायच म्हणजे नंतर तो आमचा मित्र पुढे रात्रौ साडे नऊ वाजता शिर्डीस जाईपर्यंत कसलीच तक्रार न करता चालत आला. धन्य धन्य ते साईभक्त की ज्यांना प्रत्यक्ष श्रीसाईबाबांचे दर्शन त्यांच्या समाधीनंतर ६२ वर्षे झाली तरीही होत आहे आणि अशा बहुमोल रत्नांचा–साईभक्तांचा सहवास आम्हाला मिळाला. हेही काही कमी नव्हे. श्रीसाईबाबा असेच आपल्या असंख्य भक्तास वेळोवेळी दर्शन देऊन भक्ती महात्म्य द्विगुणीत करोत हीच त्या सर्वांतर्यामी वास करणाऱ्या श्रीसाई समर्थास नम्र विनंती आणि प्रार्थना.

☆ ☆ ☆

## श्री. व्ही. बी. नंदवानी साई चरणी विलीन

श्री साईलीला इंग्रजी मासिकाचे एक लेखक व माहिम–मुंबई येथील साईभक्त श्री वीरभान चंद्रभान नंदवानी बुधवार दिनांक १८–६–८० रोजी सायंकाळी ४–३० वा. हृदयविकाराचा झटका येऊन निधन पावले. श्री. नंदवानी साईबाबांचे गेली २५ वर्षे भक्त होते. त्यांना आपण इहलोकीचा लौकरच निरोप घेणार आहोत अशी चाहूल लागली होती की काय कुणास ठाऊक ! जूनच्या पहिल्या सप्ताहात ते एकटेच शिरडीस जाऊन श्री बाबांचे डोळे भरून दर्शन घेऊन १४ जून रोजी मुंबईस परतले होते व लागलीच १८ जून रोजी त्यांनी इहलोकीचा प्रवास संपविला. हिमाचल प्रदेशातील कसोली येथे श्री बाबांच्या मंदिर बांधणीसाठी श्री. गोयल यांचेबरोबर त्यांचे सेवाकार्य गेली कित्येक वर्षांपासून चालू आहे. श्री. नंदवानी यांचा जन्म १९१५ साली डेराइस्माइलखान येथे झाला. निधन समयी त्यांचे वय ६५ वर्षांचे होते. त्यांच्यामागे वृद्ध पत्नी, तीन सुविद्य कन्या व पुत्र चि. कपिल व असंख्य मित्रपरिवार आहे.

श्री साई मृतात्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो.

# श्री बाबांचे उपदेश

—श्री. प्रेम बागरेचा,
काळे मळा, ब्लॉक नं. ३
कोपरगाव ४२३ ६०१ (जि. अ' नगर)

(श्रीसाईबाबा तपोभूमी कोपरगाव येथील स्तंभावरुन)

१) भगवान् श्रीसाईबाबांच्या दर्शनास हजारो लोक येत असत. त्यामध्ये सर्व जाती धर्मपंथाचे लोक असत, गरिब श्रीमंत असत, त्या सर्वांना उद्देशून बाबा म्हणत.

**कोण उपाशी आहे की काय ते पहा, माझे भजन करा.**

अवघे येथे (शिर्डीला) येत चला या शिवाय अधिक काही करू नका. उदी घ्या व घरी जा, मीच सर्व करतो व देतो. हा साईंचा पैसा आहे. त्याचा सद्उपयोग करा. नाहीतर तुमचे संसाराची राख रांगोळी होईल. मी व माझे असे अहं पासून दूर रहा, श्रद्धा व सबुरी ही दोन तत्वे लक्षात ठेवा, पवित्र होवून येत चला.

२) श्री बाबांच्या दर्शनास ज्या प्रमाणे दीन-दुबळे म्हातारे येत त्याचप्रमाणे शेतकरी तरुण लोक यांचाही खुप भरणा असे, बाबा त्यांना उद्देशून म्हणत,

**जवान मनुष्याने कष्ट करावे. शेतीकडे सर्व लक्ष द्यावे.**

शेताचे कष्ट हाच खरा धर्म, तू शेतात कष्ट कर जमीन चांगली नांगरीत जा. शेतीत तुला हंडे भरून रुपये सापडतील. करावे तसे भरावे, ज्याची निष्ठा चांगली त्याचे जग चांगले. सबुरी रखना, अवघ्यांना सांभाळा, अवघ्यांना जीव लावा, सर्वांना एकाच ठिकाणी जाणे आहे, शेवटी सर्वांचे घर एकच आहे. कोणत्याही भक्ताच्या संकटकाळी मी तुमचे रक्षण करीन.

३) बाबांच्या दर्शनास येणाऱ्या भाविकांमध्ये अंधश्रद्धाळु भक्तही असत, अशा भक्तांची अंधश्रद्धा दूर करताना बाबा त्यांना उपदेश करीत—

**दया, धर्म व मानवधर्म आचरणात आणा,** हरिभजन करणारे असूनही अशांचा तुम्ही विटाळ धरता ? बाबांच्या हाताचे अन्न तुम्ही सर्वजण कसे खाता, सर्व जगच जर ईश्वराचे आहे तर मनुष्याने भेदाभेद करू नये, सबका मालिक एक है, प्रत्येक मनुष्य प्राण्यांस जन्म देणारा परमेश्वर एकच आहे, सर्व त्याचीच लेकरे आहेत, आपण अशा भेद भावाने वागलो तर ते परमेश्वरास आवडेल काय ?

४) बाबांच्या लीलेची काही नास्तीक लोक टर उडवीत असत, परंतु बाबा त्यांच्यावर कधीच रागावत नसत, उलट बाबा अशा लोकांना उद्देशून म्हणत—

हे मानवा तुमचे जीवन म्हणजे अन्न, पाणी, विपुल जागा, प्रकाश वायु हे ज्याने दिले त्या परमेश्वरास तुम्ही विसरलात काय ? एक क्षण तरी त्याची स्मृती व स्तुती कर. साध्या मनुष्यांची स्तुती केल्याने व माझे म्हणून मानल्याने जे फळ मिळते त्यापेक्षा सत्ताधीश ईश्वराची स्मृती व स्तुती केल्याने तुझी इच्छा पूर्ण होणार नाही का ?

# महर्षी योगी श्रीगगनगिरी महाराज यांचे मनोगत

— प्रा. डॉ. सौ. चारुशीला गुप्ते,
एम. ए. पी. एच. डी.
वाळकेश्वर रोड. मुंबई ४००००७

* हल्लीच्या जीवनकलहाच्या खडतर कालामध्ये मानवी जीवन अत्यंत अशांत होत चालले आहे. मानमरातब, संपत्ती, सत्ता ज्यांच्याजवळ आहे अशा व्यक्ती सुद्धा, कष्टप्रद आयुष्य घालविणाऱ्या माणसा एवढ्याच अशांत असून सारासार विचार, करणाऱ्या मानवाने आपल्यापुढे अक्षय्य सुख हे ठेवण्याचे सोडून देऊन गोल्डस्मिथच्या प्रवाशाप्रमाणे सुख हेच अंतिम ध्येय त्याने आपल्या पुढे ठेविल्याने त्याच्या जीविताची उभारणी कृत्रिमतेच्या पायावर होऊन बसलेली आहे. कृत्रिमतेच्या पायावर उभारलेल्या जीविताचे सुख कृत्रिम असणार अर्थातच तो सुखाचा पारखा राहिल्याने त्यास जिव्हाळ्याच्या प्रेमाचे स्थान लाभत नाही. अंतरीचा आनंद मिळत नाही व जीवितसार वस्तूंनी भरलेले आहे असे अनुभवास येत नाही. एकंदर समाजाची अशी कष्टमय स्थिती झाल्यावर समाजामध्ये नीतीचा धरबंद रहावा तसा रहात नाही व समाजसेवेचे महत्त्व पटत नाही, याचा परिणाम मात्र असा होतो की, दंभाचे साम्राज्य चालू रहाते, मानापमानाची बंधने दृढमूल होऊन बसतात. त्यामुळे कलहाग्नी धुमसत जाऊन पेट घेत राहतो व एकीच्या अभावी फाटाफूट होत जाऊन सर्व समाज विस्कळीत होऊन जात असतो.

समाजाची अशी अनिष्ट स्थिति झाल्यावर मानवी जीविताचे उच्चतम ध्येय कोणते, अंतरींची तळमळ म्हणजे काय, नीतीतत्त्वाचा परिणाम आपल्या चारित्र्यावर करून घेऊन इहलोकींचेच काय पण पारलौकिक सुख मिळवावयाचे कसे व त्याचा साक्षात् अनुभव येथे घ्यावा कसा, किंबहुना संसाराच्या द्वारा परमार्थ साधावयाचा कसा या गोष्टीबाबत शिकवणीस आज आपला समाज पारखा होत चालला आहे. अंतरींची तळमळ प्रेमाच्या ओलाव्याने निवविण्यास अंतरींचाच म्हणून जिव्हाळ्याचा उपदेश हवा लागतो. त्याशिवाय समाजाची घडी नीट बसत नाही व मानवी जीवित सारमय आहे हे अनुभवास येतही नाही.

अशा परिस्थितीमध्ये ‘ परित्राणाय साधुनाम्— ’ अशा संकेताने समाजाला आध्यात्मिक मार्गदर्शन करण्यासाठी पुढे सरसावलेल्या एखाद्या महान व्यक्तीचे दर्शन घेऊन त्यांचे विचार ऐकायला प्रत्येकाला इच्छा होणे स्वाभाविकच आहे. म्हणूनच कोल्हापूर जवळच्या गगनगिरी पर्वतावर घोर अरण्यात निवास सदैव करणारे

व सतत पाच तपे तप साधना करणारे योगी श्रीगगनगिरी महाराजांचा सध्या मुक्काम कुलाबा जिल्ह्यातील खोपोली गावी आहे हे ऐकून मी त्यांच्या दर्शनाला गेले.

खंडाळयाच्या घाटाजवळ असलेल्या मंकीहिलच्या जवळ महाराजांचा आश्रम आहे. ते स्वतः एका पर्णकुटीमध्ये राहतात. जवळच टाटा इलेक्ट्रीक पॉवरच्या बाजूने येणारा एक प्रचंड पण स्वच्छ पाण्याचा प्रवाह अखंड वाहत असतो. दररोज पहाटे गगनगिरी महाराज त्या पाण्यात बसून ध्यानधारणा करतात. नंतर कुणी भेटायला आले तर त्यांच्या बरोबर ते विविध विषयांवर चर्चा करतात. अर्थात अध्यात्मिक प्रगती व सामाजिक नीती ही दोन तत्वे त्या चर्चेमध्ये प्रमुख असतात.

हा परिसर जंगल व्याप्त असून अतिशय रमणीय आहे. त्यामुळे तिथे चार घटका बसल्यानंतर मन सुप्रसन्न होते. या परिसरामध्ये मुले व प्रौढ व्यक्तींसाठी गगनगिरी महाराज एक मोठा प्रकल्प उभारणार आहेत. त्यांतून सुसंस्कारीत व लोककल्याणाचे जे महान कार्य होणार आहे. तसेच भावी–पिढी मनाने निकोप व शरीराने सुदृढ होईल अशा तऱ्हेचा जो प्रयत्न केला जाणार आहे त्या संबंधी एकूण सविस्तर माहिती ऐकून मी अत्यंत प्रभावित झाले व त्या कार्याच्या अनुरोधाने मी महाराजांबरोबर थोडीशी चर्चा केली.

गगनगिरी महाराज नाथपंथीय आहेत. पारमार्थिक श्रेयाचा वाटा सर्व सामान्य माणसालाही मिळावा ही गौतमबुद्धाची शिकवण नाथपंथाने जोपासली व वाढीला लावली. योग्यांनाही काही सामाजिक कर्तव्ये असतात ही जाणीव या पंथातील अगदी आद्य नाथांपासून आजतागायत संभाळली गेली आहे. समन्वयाच्या या सामाजिक भूमिकेवरून या पंथामध्ये स्त्री शुद्रांनाही समाविष्ट करून घेण्यात आले. 'म्हणोनि जाति कुळवर्ण। हे अवघेचि गा अकारण। एथ अर्जुना माझे पण। सार्थक एव॥' या ज्ञानेश्वरांच्या सिद्धांताप्रमाणे नाथपंथ सामाजिक जाणीवेतून व ध्येयातून आकारास आला आहे. या पंथाचा हा वारसा श्रीगगनगिरी महाराजांकडेही स्वाभाविकरित्या आलेला असल्यामुळेच खोपोलीच्या प्रकल्पाची कल्पना त्यांना राबवायची आहे.

बराच वेळ या कार्याबद्दल त्यांच्याकडून मला माहिती मिळाल्यावर येत्या २६ सप्टेंबरमध्ये त्र्यंबकेश्वरी होणाऱ्या कुंभमेळयाच्या समारोपाबद्दल विषय निघाला. महाराज स्वतः या कुंभमेळयाच्या समारोपाला उपस्थित राहणार असून तिथे जमणाऱ्या असंख्य बैरागी, गोसावी, संत, तडीतापसी यांना त्यांच्या अमोघवाणीतून स्रवणाऱ्या ज्ञानामृताचा फायदा मिळणार आहे. 'कुंभमेळयामागची कल्पना अतिशय उच्च आहे. अर्थात ती कशी राबविली जाईल यावर तिची ध्येयसिद्धि अवलंबून आहे.' असे महाराज बोलता बोलता सहज म्हणाले. महाराजांना त्र्यंबकेश्वरासारख्या

कुंभक्षेत्राबद्दल आत्यंतिक आदरभाव आहे. 'प्रत्येकाने एकदातरी या स्थानाला भेट द्यावी' असे त्यांचे मत आहे.

कुंभमेळ्याच्या संबंधी महाराजांबरोबर बोलताना ते म्हणाले,

"संकटकाळी मानवाचा उद्धार होण्यास धर्मशक्ती ही एकच कारणीभूत होईल, आणि पंचमहाभूतांची शक्ती त्याला तारून नेईल. सध्या भारतीय मानव दुःखसंकटाच्या फेऱ्यात अडकल्यामुळे तो संभ्रमित झाला आहे. आपले नेमके कुठे चुकत आहे हे त्याला आकलन होत नाही. युगानुयुगे ऋषीमुनींना, सज्जनांनी आणि धर्मप्रवण राज्यसत्तेने जे पायंडे पाडले व जे धडे घालून दिले ते काटेकोरपणाने पाळल्यास सुख मिळेल. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात आपण कुठली अपेक्षा करतो ? कोणत्याही प्रकारचे समाधान आपण आत्मसात करू शकत नाही. कारण त्याला मनाचा खंबीरपणा, आत्मविश्वास श्रद्धा, निष्ठा व भक्ती यांचा संगम आवश्यक आहे. त्याच्या अभावामुळेच आपण अनेक प्रकाराने दुःखसागरात गटांगळ्या खात आहोत.

सध्या सर्वत्र कुटुंबरचना बिघडली आहे. सर्वसामान्य माणूसच नव्हे तर राज्याप्रमाणे धनिक सुद्धा पराच्या गादीवर बसून सुखी नाही. मग सुख आहे तरी कुठे ? ते कसे मिळवायचे ? चुकते आहे कुठे ? या नव्या युगात अंतीम व श्रेष्ठ सुख व मनःशांती मिळवायची असेल तर नव्या जुन्याचा समन्वय करा. जुने सर्व टाकू नका कारण जुन्याचा पाया फार श्रेष्ठ व्यक्तींनी रचलेला आहे. त्यावर नव्याची इमारत बांधा ! धर्मबुद्धी व कर्तव्याचे पालन न केल्यामुळे सारी माणसे अशांत झाली आहेत. तरुणांची मनस्थिती भांबावली आहे, छोट्यांच्या मनावर सुसंस्कार होत नाहीत. करोडोपतींनाही लक्ष्मी दारी लोळत असताना सुख शांती मिळत नाही. 'सुंदर बंगले, मोटारी आहेत पण घरी चूल पेटत नाही. हॉटेलकडे धाव घेतली जाते' अशी अनेक धनिक माझ्याकडे कबूली देतात. प्राचीनकालापासून भारतामध्ये एकत्र कुटुंबपद्धती होती. आज या ना त्या कारणास्तव ती बिघडली आहे. निदान तिच्याशी मिळती जुळती होईल अशी कुटुंबरचना आखा. असे जर घडले नाही तर भूकंप, उत्पात अतिवर्षाव, अवर्षण अशा निसर्ग निर्मित आपत्ती निर्माण होतील. विभक्त राहून त्यांना तोंड देणे शक्य होणार नाही. विचार करा ! देवाला हे उत्पाताचे शासनयंत्र काढायला लावू नका. असत्यापासून दूर राहून नीतीनियमनाचे पालन करा.

हे मानवा तुझ्या कल्याणाचा मार्ग धर्मबुद्धी आहे. हे ध्यानात ठेव. शोधा म्हणजे सापडेल असा आमचा मनोमन विश्वास आहे. नाथसंप्रदायाला स्मरून हे मी सत्य सांगत आहे. दया, क्षमा, शांती व समाधान वृत्तीने राहिल्यानेच मानवाचे कल्याण होईल. त्याला आवश्यक ते शरीराला धार्मिक वळण दिल्याने हे घडेल. सध्या सर्वांनाच कलीचा तडाखा बसतोय हे ध्यानात ठेवा. या संकटातून कुणीही बाहेर येणे शक्य नाही. म्हणून दैवी सत्पुरुष, योगी, धर्मपुरुष यांच्या सहाय्याने

तीर्थे समुद्र, पर्वत, धर्मस्थाने, ग्रंथराज, सज्जन गृहस्थश्रमियांचा सहवास इत्यादींच्या आधाराने राहण्यांचा यत्न करू या. तरच सुखाची लक्ष्मणरेषा सापडेल. कलीचे सामर्थ्य असले तरी भक्ती संस्कार झाल्यास भिण्याचे कारण नाही व याचे प्रतीक म्हणून कुंभमेळे, साधूसमाज, तीर्थराज त्याकडे बारकाईने लक्ष दिले म्हणजे तुम्हाला सुख साध्य होईल. अडल्या नडल्या जीवाला सहारा मिळेल.

मी म्हटले, ' महाराज यासाठी आचारधर्म कोणता असावा. '

गगनगिरी महाराजांनी चटकन उत्तर दिले—

' आर्यावर्तामध्ये अनादी प्राचीनकालापासून दुःख संकटे आणि सुख यांचा सारखाच समन्वय होत गेला आहे. तथापी तरले कोण ! सज्जन बुद्धीचा सहवास करून निष्काम कर्माचा बांधा तयार करून आचार, विचार आणि उच्चार युक्त आहार विहार आणि शुद्धीकरण तसेच वेळोवेळी येणाऱ्या नव्या राजतंत्राशी सहकार्य आणि समन्वय बुद्धीने वागून दोष टाळून स्वबल व आत्मबल एकवटून, धर्मप्रेरणा घेऊन ईश्वरी साधना केलेले महान जीव भारतखंडात आहेत. त्यांनीच वेळोवेळी चेतन शक्ती निर्माण केल्याने निस्पृह वृत्तीची वचने ईश्वराकडे व समाजाकडे फेकली व स्वतः ती आचरणात आणली म्हणून त्यांच्या पायाजवळ सर्व संपन्न सुख मिळत असल्याचा अनुभव आहे. कलीयुगातील नाथपंथाचे महत्व ओळखून यथासांग सेवा करावी. गहनीनाथांनी निवृत्तीनाथांना भागवत संप्रदायाची दिक्षा त्र्यंबकेश्वरी दिली. म्हणूनच दक्षिण भारतात तो पंथ सामर्थ्यवान झाला आहे. तरी या पवित्रक्षेत्री त्र्यंब-केश्वरी बहुमोलांचे पुण्य मिळावे म्हणून कुशावर्तवर कुंभमेळे चालू होणारच आहेत. त्यांना आपण सर्वांनी यथाशक्ती धर्मबुद्धीने सहकार्य करावे व त्यांची सेवा करावी. तुम्ही पण धर्मवृत्तीने राहावे म्हणजे भागवत धर्माची खरी सेवा होईल.

गहिनीनाथ पंथाचे मुख्य श्री गगनगिरी महाराज गगनगड पीठाचे प्रवर्तक हे त्र्यंबकेश्वरी कुंभमेळ्यासाठी येत आहेत. सह्याद्री पर्वतातील गहिनी गुंफेकडेचे नंतर ते गगनगडला जाणार. सध्या खोपोली येथे त्यांचे वास्तव्य आहे. तरी त्यांच्या दर्शनाचा लाभ घेऊन संकट मुक्त व्हावे. त्यांचे वय ८०/९० कडे गेलेले आहे. त्यांचा अनु-भव व अलोट तपश्चर्या लक्षात घेण्यासारखी आहे. सर्व भारतभर त्यांनी संचार केला आहे. त्यांची कठोर तपश्चर्या गेली ८० वर्षे चालूच आहे. हिमालय ते कन्याकुमारी पर्यंत ते संचार करतात व एरवी गगनगड येथे गुंफेत राहतात.

महाराजांचा संदेश ऐकल्यानंतर मला कितीतरी गोष्टींचे आकलन झाले. तसेच खोपोली येथे जाऊन महाराजांचे दर्शन घेतल्याचे सार्थक झाले असे मनाला वाटले. कुठल्याही तऱ्हेचे मठातटाचा व शिष्यांच्या परिवाराचे अवडंबर न करता खऱ्या ज्ञानाच्या प्राप्तीमुळे व कठोर तपस्येमुळे गगनगिरी महाराजांचे व्यक्तित्व उजळून निघाले आहे असा विचार माझ्या मनात दृढमूल झाला.

# धन्य बाबा धन्य तुमची

—श्री. आण्णासाहेब बिचूदकर, बी. ए.
वाकी आश्रम, डहाणू रोड, जि. ठाणे.

● तसा मी बाबांचा भक्त गेली तीस बत्तीस वर्षे आहे! ही भक्ति लागायची, त्यालासुद्धां संचित असावे लागते आणि तेही पूर्ण संचित असल्याशिवाय भक्तिला माणूस लागत नाही! माझे पूर्व संचित होते म्हणूनच मी बाबांचा निस्सीम भक्त बनू शकलो!

सरकारी नोकरीत ज्या खात्यामध्ये मी काम करीत होतो, त्या ठिकाणी मला वेळोवेळी प्रसंग येई; परंतु त्यांतूनही मी वेळात वेळ काढून रामनवमीच्या उत्सवाला किंवा जमल्यास गुरुपौर्णिमेला बाबांच्या दर्शनाला जात असे! ह्या दोन्ही प्रसंगी मला रजा न मिळाल्यास मी विजयादशमीच्या उत्सवाला न चुकता बाबांच्या दर्शनासाठी अगदी आवर्जून जात असेच!

वर्षातून असे एक दोन वेळा मी बाबांच्या दर्शनासाठी आणि त्यांच्या आशीर्वादासाठी जात असताना माझे नोकरीचे दिवस संपत आले! नोकरीतून मुक्त होण्याची वेळ आली! सरकारी नियमाप्रमाणे मी रीटायर होण्यास थोडे दिवस राहिले आणि शेवटच्यावेळी मी बाबांच्या दर्शनाला गेलो. तो अगदी गहिवरुन आले मला! त्यावेळी मी अगदी दुःखी झालो! नोकरीमध्ये होतो तर, मी माझ्या स्वतःच्या पैशावर शिर्डीला जा ये करीत होतो; अन् आता मात्र मुलांकडून पैसे मागून शिर्डीला जायला लागणार! या विवंचनेने मी अगदी बेचैन झालों अन् बाबांच्या मंदिरात माझे मन द्रवले अगदी! बाबांच्या त्या भव्य मूर्तिकडे अन् समाधीकडे पहात मी मनातल्या मनात म्हणालो सुद्धा! 'बाबा, खरंच आता हक्काने काही मला दर्शनाला येता येणार नाही तुमच्या यापुढे!'

कां कोण जाणे! पण असे म्हणायला अन् बाबांच्या त्या भव्य विशाल संगमरवरी मूर्तिवरील मस्तकाच्या उजव्या बाजूचे एक रक्ती गुलाबाचे फूल खाली पडले! मी सहृदय बाबांना वंदन केले। योगायोगे.

रिटायर होऊन तीनच दिवस झाले मला! मी जेथे राहत असे तेथे जवळच एक बाबांचे मंदिर बांधले होते एका भक्ताने! तेथे मी दररोज दर्शनाला जात् असे! त्या ठिकाणी एक वृद्ध गृहस्थ दररोज दर्शनाला येत असत! आणि त्या दिवशी त्या वृद्ध गृहस्थानी माझी अगदी आपुलकीने चौकशी केली! अन् मी माझ्या घरची सर्व परिस्थिती विदीत केली भावनेच्या भरात! त्यांनी मन लावून माझे सर्व ऐकून घेतले त्यावेळी!

त्यानंतर दोनच दिवसांनी पुढे ते गृहस्थ मला त्या मंदिरात भेटले ! मी जरा उशीराच आलो होतो त्या दिवशी दर्शनाला ! मंदिरात ते गृहस्थ माझी वाटच पहात बसले होते त्यावेळी ! मी बाबांचे दर्शन घेऊन त्या वृद्ध गृहस्थांना नमस्कार केला नेहमी प्रमाणे !

मला पाहून त्यांनी पण नमस्कार केला अन् म्हणाले, "मी मुद्दामच थांबलो होतो तुमची वाट पहात !" 'का' म्हणून मी विचारले त्यांना, तर त्यांनी उत्तर दिले, "अहो बोलावले आहे बाबांनी शिर्डीला तुम्हाला" !

मी सर्दच झालो ! थट्टा तर नाही ना करीत हे माझी असा पुसटसा विचार पण मला माझ्या मनाला चाटून गेला त्यावेळी !

"अहो बघता काय माझ्याकडे असे ! खरंच उद्या तुम्हाला जायला लागेल शिर्डीला ! घरी सांगून ठेवा बरं का !"

मी जास्तच स्तंभित झालो तर ते वृद्ध गृहस्थ म्हणाले, "उद्या तुमच्या नावाची आर्डरच घेऊन येतो तिथल्या नोकरीची ! मग तर खरं वाटेलना तुम्हाला ! अन् परवापासून जायचं बरं का शिर्डीला नवीन कामावर हजर व्हायला !"

आणि खरंच दुसऱ्याच दिवशी 'त्या वृद्ध गृहस्थांनी माझ्या नावाची नवीन नोकरीची शिर्डीची ऑर्डर आणली पण ! मी अतिशय खूष झालो त्या वृद्ध गृहस्थावर ! फक्त रिटायर होऊन पाचच दिवस झाले मला तर परत बाबांनी भाकरी दिली म्हणून ! बाबाच प्रसन्न झाले त्या वृद्ध गृहस्थांच्या रुपात !

"नीट व्यवस्थित काम करा बरं का ! अन् बाबांची सेवा पण करायला विसरू नका हं !" असा पोक्त सल्ला देऊन त्या वृद्ध गृहस्थांनी माझा निरोप घेतला !

घरी माझ्या थोरल्या मुलीला ही गोष्ट सांगितली तर ती जरा नाराजच झाली माझ्यावर ! कारण मला तिला एकटीलाच घरी सोडून शिर्डीला नवीन नोकरीवर हजर व्हायचे होते ! तरणी ताठी, कुमारिका अशा परिस्थितीत तिला सोडून जायचे होते मला ! पण नाइलाज होता माझा ! बाबांच्या ठिकाणी नोकरी मिळाली, सर्व काही ठीक होऊन आपण सुखी होऊ अशी आशा दाखवून आणि तिची समजूत घालून मी शिर्डीला नवीन नोकरीला हजर होण्यास गेलो !

घरची सर्व जबाबदारी ज्याच्या त्याच्यावर टाकून मी शिर्डीला नवीन नोकरीवर हजर झालो ! एक मन आनंद देत होते की, जेथे वर्षातून एक दोन वेळा बाबांचे शिर्डीला दर्शन मिळायचे तेथे मला दररोज दर्शन मिळणार म्हणून ! पहाटेच्या आरतीला न चुकता जायला लागलो मी ! मन अगदी प्रसन्न व्हायचे माझे ! लोण्याचा प्रसाद दररोज घेत असे मी !

दिवसभरात कामाच्या गर्दीमुळे परत जाता येत नसे मंदिरामध्ये, तरी रात्री मात्र रोज आरतीच्या वेळी मी हजर असे! बाबांची रोज आरती झाल्यानंतर बाबांच्या मंदिरातून जड पावलांनी निघून मी खिन्न मनाने विचार करीत माझ्या खोलीवर परतत असे दररोज.

माझी अशी दिनचर्या असताना मला फक्त एकाच गोष्टीची रुखरुख वाटत असे अन् ती फक्त एकाच गोष्टीची की, मी माझ्या तरण्याताठ्या थोरल्या कुमारिकी मुलीला एकटीच घरी टाकून मी बाबांच्याकडे आलो होतो! बाबांच्यावर नितांत श्रद्धा ठेवून आणि सबुरीचा संकेत घेऊनच आलो होतो मी शिरडीत बाबांच्याकडे! अन् ते देखील सर्व मोहांना बाजूला ठेवून! सेवा करण्यासाठी!

घरी एकटीच ती माझी थोरली मुलगी होती घरात! महिन्याच्या महिन्याला तिला खर्च करण्यासाठी मी पैसे पाठवीत असे. माझा शिरडीतला महिन्याला लागणारा खर्च सोडून! ती पण नोकरी करीत होती नर्सची एका प्रायव्हेट नार्सिंग होम मध्ये! तिची आई पण तिच्याच सारखी नर्सची नोकरी दोन आपल्या शाळकरी मुलांना घेऊन मुलीच्या ठिकाणापासून शंभर मैलांवर करीत असे! अन् थोरला मुलगा मात्र मुंबईला एका कंपनीमध्ये नोकरीस असे व तेथेच कंपनीच्या क्वार्टर्सवर राहत असे! महिन्यातून एखादेवेळी तो बहिणीला भेटत असे!

दिवसामागून दिवस गेले! महिन्या मागून महिने जाऊ लागले! कधी कधी मन उदास व्हायचे माझे! घरून पत्र आले मुलांच्या आईकडून की 'एकटी थोरल्या मुलीला टाकून गेलात शिर्डीला म्हणून!' असे बोचरे शब्द आले पत्रात की मन अगदी खट्टू व्हायचे माझे!

बाबांच्या पहाटेच्या आरतीच्या वेळी कधी कधी अश्रू यायचे माझ्या डोळ्यामध्ये! आपण चुकलो तर नाही ना येथे येऊन! अशी खोटी कल्पना तरारून जायची माझ्या डोळ्यापुढून! आपण इकडे आहोत अन् आपली थोरली मुलगी काय म्हणत असेल आपल्याला! असा विचार पण कधी कधी डोक्यामध्ये येऊन जायचा अन् मग सबंध दिवस त्या दिवशी माझा उदास उदास असा जायचा अगदी!

एके दिवशी अशीच बाबांची पहाटेची आरती सुरू व्हायच्या अगोदरच बाबांच्या त्या भव्य सुंदर संगमरवरी मूर्तीकडे पाहून मला अगदी हुंदकाच आला! कां कोण जाणे पण घरची आठवण झाली माझ्या थोरल्या मुलीची आणि मी अक्षरशः मुसुमुसु रडूच लागलो.

अन् त्याचवेळी मंदिरातील आरती करणाऱ्या त्या पूज्य एका पुजाऱ्याची नजर माझ्यावर खिळली!

आरती संपल्यानंतर मी प्रसादासाठी रांगेत उभा राहिलो तर माझ्या खांद्यावर यांनी हात ठेवला अन् मला ते पूज्य पुजारी म्हणाले. 'मिस्टर जरा प्रसाद घेतल्या-नंतर गाठ घ्या माझी मंदिराच्या गाभाऱ्यात !'

प्रसाद घेऊन झाल्यावर मी त्या पूज्य पुजाऱ्याला मंदिरात एका कोपऱ्यात बसले असताना भेटलो !

'कां हो, जरा मी विचारू का एक प्रश्न आपल्याला ?' त्यांनी सुरुवात केली बोलायला !

मी ओळखले त्यांच्या बोलण्याचा रोख, अन् दुसऱ्याच क्षणी विषयाकडे वळालो तर ते निक्षून म्हणाले, 'मला माहीत आहे तुम्ही का दुःखी आहात ते !'

मी आश्चर्यचकित झालो त्यांचे हे शब्द ऐकून ! त्यांना कसे माहित की मी कोणत्या कारणाकरिता दुःखी आहे म्हणून ?

पण त्यांनीच पुढे सांगायला सुरुवात केली.

'मला सांगितले आहे माझ्या मुलाने तुम्ही का दुःखी आहांत म्हणून ! तुम्ही दररोज येथे या वेळेला येता हे पहात असतो तुम्हाला तो !'

मी जास्तच आश्चर्यचकित झालो ! हा मुलगा कसा काय ओळखतो बुवा मला ! काही उलगडाच होईना मला !

मी विचारले, 'कोण मुलगा, मला जरा भेटायला सांगाल का त्याला केव्हा-तरी ! अन् असे म्हणत असतानाच तो मुलगा दर्शनाला आला, त्यावेळी ते पूज्य पुजारी त्याचेकडे बोट दाखवून म्हणाले,' हाच माझा मुलगा तो तुम्हाला ओळखतो !

त्याने माझ्याकडे पाहिल्यावर त्यानेच मला नमस्कार करून अगदी अदबीने विचारले, 'ओळखले का सर तुम्ही मला ?'

मी नाही म्हटल्यावर त्याने सुरवात केली, 'सर तुमच्या हाताखाली होतो मी काम करीत पाच-सहा वर्षां पूर्वी !'

मग मला जरा जरा आठवू लागले ! माझ्या हाताखाली रिटायर व्हायच्या अगोदर पाच सात वर्षांपूर्वी काम करणारा हा लेखनिक आता बराच मोठा झाला होता ! त्याची बदली शिर्डीजवळच झाल्याने तो वडिलांच्याकडे राहत असे ! पण विचाऱ्याने माझी ओळख ठेवली होती मात्र आतापर्यंत ! मी माझ्या सहकाऱ्यांना सांगत असे घरची परिस्थिती त्यावेळी अन् या मुलाच्या कानावरपण ही गोष्ट गेली होती त्यावेळी.

आणि तेवढीच नेमकी गोष्ट लक्षात ठेवून आपल्या वडिलांना सांगून त्याचा उलगडा करून घ्यायचा होता त्याला यावेळी !

जास्त वेळ न घेता त्या पूज्य पुजाऱ्यांनी मला त्याच दिवशी दुपारी घरी बोलावले !

चहा घेता घेता त्या पुज्य पुजाऱ्यांनी सर्व गोष्टी समजावून घेतल्या माझ्या-कडून अन् मग त्यांनी एक व्रत करायला सांगितले मला ! अन् ते म्हणजे बाबांच्या आरतीच्यावेळी पहाटे यायचे आरतीला पण बाबांच्या मंदिरा समोर असलेल्या नंदी-जवळच उभे राह्यचे आपण ! आत मंदिरात यायचे नाही की बाबांच्या समाधिला हात नाही लावायचा आपण ! दुरुनच दर्शन घ्यायचे आपण !

जरा कठीणच व्रत होते हे त्या पूज्य पुजाऱ्यांनी सांगितलेले ! पण त्यांचेवर संपूर्ण विश्वास ठेवून अन् मनाचा निर्धार करून सुरुवात केली मी दुसऱ्याच दिवसा-पासून त्या व्रत आचरणाची !

मन दुःखी व्हायचे माझे ! उद्वेग यायचा मनाला कधी कधी ! पण व्रत आचरण्याची अगदी शिकस्त केली मी त्यावेळी ! कधी कधी वाटायचे, अरे, आपण येथे चोवीस तास असताना बाबांचे दर्शन दुरुनच घ्यायचे ! लोक लांबून लांबून येतात दर्शनाला, अन् आपण बाबांच्या सानिध्यात असताना आपण लांब उभे राहूनच दर्शन घ्यायचे ! मनाला पटत नव्हती ही गोष्ट ! रुचत नव्हती ! पण व्रत म्हणूनच मी आचरीत होतो ! निष्ठा म्हणून ! आणि सबूरीचा संकेत घेऊनच मी वागत होतो तसा !

कधी कधी वाटायचे, की, उगीच आपण बाबांच्यावर संकट टाकले ! पण त्या पूज्य पुजाऱ्याने सांगूनच ठेवले होते मला की, "जे तुम्ही आम्ही करीत नाही ते बाबा करण्यास समर्थ आहेत ! विश्वास ठेवा अन् वाट पहा म्हणून !"

अन् खरंच, अगदी फक्त तीनच गुरुवार नंतर चौथ्या गुरुवारी प्रचिती आली त्यांची मला ! विश्वास ठेवला म्हणूनच प्रचिती आली म्हणा ना ! सबूरी ठेवली म्हणूनच प्रचिती आली म्हणा ना !

त्या दिवशी गुरुपौर्णिमा होती ! अन् ती पण गुरुवारचीच गुरुपौर्णिमा ! बाबांच्या आवडत्या वाराची ! गुरु दत्तात्रयांच्या वाराची पौर्णिमा ! मंदिरात अगदी गर्दीच गर्दी होती पहाटेच्या काकड आरतीला त्या दिवशी ! आत शिरायला जागा नव्हती अगदी ! स्त्रियांच्या बाजूला अन् पुरुषांच्या बाजूला दोन्हीकडे खेचून लोक उभे होते आरतीला ! आरती सुरू झाली ! मी मंदिराच्या समोरील मंचाशेजारी लांब उभा होतो ! आरतीचे शेवटचे कडवे झाले ! लोक दर्शनासाठी पुढे सरकू लागले अन् मी मात्र गप्प लांब उभे राहून बाबांना वंदन केले ! मन खिन्न झाले माझे ! आज गुरु-पौर्णिमा ! अन् बाबांच्या समाधीलासुद्धा आपण स्पर्श करू शकत नाही या व्रतामुळे ! मनाची कशी बशी समजूत घालून मी रांगेत उभा राहिलो लोण्याचा प्रसाद घेण्या-साठी ! अन् तेवढ्यात मंदिरातील गाभाऱ्यातून निघालेल्या एका गृहस्थाची अन

माझी दृष्टादृष्ट झाली ! त्यांनी लांबूनच गर्दीमधून हात वर केला अन् वर दोन्ही हात जोडून नमस्कार केला मला ! मला ओळखले नाहीत ते गृहस्थ, पण मी पण प्रत्युत्तर म्हणून नमस्कार केला !

प्रसाद घेऊन झाल्यावर त्या गृहस्थाची वाट पहात मंदिराच्या बाहेरील पाय-रीवर वाट पहात उभा राहिलो ! ते पण प्रसाद घेऊन बाहेर पादत्राण घेण्यासाठी आले अन् म्हणाले.

'ओळखलं की नाही मला आण्णासाहेब ?'

मी, 'माफ करा हं, पण मी काही तुम्हाला ओळखले नाही बुवा !' असे म्हणताच—

'अहो जाहो काय म्हणता मला आण्णासाहेब ! मीं तुमच्या धाकट्या भावा-सारखा ! अहो मी पुण्यात असताना आणि तुम्ही पण तेथे असताना तुमच्याकडे यायचा मी आरतीला बाबांच्या माझ्या मावशीबरोबर !'

'येत असाल बुवा ! मला नाही आठवत तुमची फिगर !' असे म्हणताच त्यांनी सुरुवात केली सांगायला !

'त्यावेळी मी पुण्यात तुमच्याकडे येत होतो ना त्या सुमारास मी पंधरा एक वर्षाचा होतो !'

मी पुण्यात होतो खरा, पण फार पूर्वी म्हणजे तीस एक वर्षांपूर्वी ! अन् त्यावेळी मी घरीच बाबांची आरती करायचा ! त्यावेळी दोन-चार माणसे यायची आरतीला ! पण ह्या गृहस्थास काही मला ओळखता आले नाही, येवढ्या वर्षांनंतर ? अन् सहाजिकच आहे ! एवढ्या वर्षांनंतर मी तरी कसा ओळखू शकणार त्यांना ? पण मला आश्चर्य वाटले त्याचे की, इतक्या तीस वर्षांनंतरही त्यांनी मला ओळखलें म्हणून ! गृहस्थ आता पंचेचाळीसच्या दरम्यानचे अन् दोन मुलांचे पिता होते !

'खरंच जाऊ द्या हो ते !' असे म्हणत त्यानी सुरूवात केली बोलायला पुढे !

'इकडे कुठे आज आलात तुम्ही अण्णासाहेब ? कां आज गुरुपौर्णिमा म्हणून आलात दर्शनाला !'

मी माझ्या नोकरीची माहिती दिल्यानंतर ते गृहस्थ म्हणाले, 'दैववान आहात आण्णासाहेब तुम्ही ! दररोज दर्शन मिळते तुम्हाला बाबांचे !'

पण मी माझ्या व्रताचे सांगितले तर एकदम उसळल्या सारखे ते गृहस्थ मला म्हणाले, 'एवढ्यासाठी तुम्ही बाबांच्यावर संकट टाकले ! काळजी काय करता तुम्ही अण्णासाहेब ! माझ्याकडेच एक मुलगा आहे लग्नाचा ! 'मी गावी गेल्यावर कळविन तुम्हाला तिकडून त्याची माहिती !'

एव्हाना आम्ही बोलत बोलत बाबांच्या गुरुस्थानाजवळ आलो होतो ! सकाळच्या वेळीं मिळणारा संस्थाचा टंपूसभर बाबांचा चहा घेतला चार आण्यातला ! अन् पुढे थोडी मुलाची माहिती पण सांगितली मला ! या गृहस्थानी त्यावेळी !

'मी हमी घेतो तुमच्या मुलीच्या लग्नाची.' असे म्हणून त्यांनी बाबांच्यावर आता भार टाकू नका' असे सांगितले मला! पण मीच त्यांना म्हणालो, 'ते खरे' आहे, पण मुलीचे लग्न होईपर्यंत तरी मी व्रत नाही सोडणार बुवा!'

'बरं अण्णासाहेब!' असे म्हणून त्यांनी ती वेळ मारून घेतली!

पुढे गृहस्थ त्या गुरुपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी गावी गेल्यावर चार-पाच दिवसात पत्र आले त्यांचे त्यांच्या गावावरून!

नंतर आम्ही दोघे पति-पत्नी जाऊन त्या मुलाला बघून आलो! हे मध्यस्थी गृहस्थ होतेच त्यावेळी! पुढे मुलगी पहाण्यासाठी मुलाकडील माणसे आली बघा आमच्याकडे! स्थळ चांगले, आहे असे त्यांना समजल्यावर त्यांनी लगेच मुहूर्त काढायला सांगितला आम्हाला! पुढे मुहूर्त काढून आमच्या थोरल्या मुलीचे लग्न अगदी थाटात झाले!

लग्न झाल्यावर नवीन वधूवरांना शिर्डीला बाबांच्या मंदिरामध्ये अभिषेक आणि सत्यनारायणाची पूजा घालायला सांगितली! वधू वरांकडील बरीच मंडळी होती त्यावेळी! पूजा झाली! बाबांच्या कृपेने आणि श्रद्धा व सबूरी ठेवली म्हणून सर्व व्यवस्थित सोहळा पार पडला! मुलीचा संसार सुखाने सुरु झाला! माझे व्रत पण मी उद्यापन करुन सोडले! त्या पूज्य पुजाऱ्याचे आभार मानले! बाबांची क्षमा मागितली की, मी इतक्या दिवस तुमच्या सान्निध्यात असून सुद्धा तुमच्या दर्शनाचा लांबूनच आनंद मानीत होतो! बाबांनी क्षमा केली मला!

पुढे माझे शिर्डीमधील काम पण संपले! मी परत घरी आलो!

घरी आल्यावर दुसऱ्याच दिवशी मी नेहमी जात असे त्या बाबांच्या मंदिरामध्ये बाबांच्या दर्शनासाठी गेलो! तर तेथे मला कळले की ते वृद्ध गृहस्थ मला प्रथम जेव्हा भेटले व ज्यांनी मला शिर्डीला जायला प्रवृत्त केले अन् ज्यांनी नोकरीसाठी मला शिर्डीला पाठविले व बाबांची सेवा करायला सांगितली अन् जे यासर्व गोष्टीला कारण झाले ते थोर वृद्ध गृहस्थ जगातून निघून गेले होते मी शिर्डीला गेलो त्यानंतर तीनच आठवड्यांनी!

मन अगदी खिन्न झाले ऐकून! का कोण जाणे पण बाबांची ती भव्य सुंदर संगमरवरी मूर्ती आठवून माझ्या डोळ्यात दोन अश्रू आले त्यावेळी!

मनात मी म्हणालो, "बाबा, तुमच्या लीलेचा कोण सांगे पाडसाचा, जेथे माझी आर्ष वाचा टिकेल सांगा कोठूनी!"

श्री संत शिरोमणी दासगणू महाराजांच्या या दर्दभरी ओवीने अंतःकरण जड करीतच गुणगुणत मंदिराच्या बाहेर पडलो त्यावेळी!

"धन्य बाबा, धन्य तुमची!!"

# सद्गुरूंचा गोड उपदेश

—श्री. अनिल केशवराव रसाळ
२१/३८२, बी. पी. टी. स्टाफ क्वार्टर्स,
रेनॉल्डस् रोड, वडाळा (पूर्व) मुंबई ३७

• गुरुवार १ नोव्हेंबर १९७९ एक बिन चेहऱ्याचा दिवस. नेहमीसारखाच ! फरक इतकाच की त्या दिवशी मला उठल्याबरोबर श्रींच्या मूर्तिचे ध्यान करावेसे वाटले पाच मिनिटे मूर्तिसमोर बसलो. हृदयात मूर्तिची स्थापना केली व सर्व प्रातर्विधी आटोपल्यावर नेहमीप्रमाणे पूजा केली. नकळत एक प्रबळ इच्छा झाली की आज शिरडीप्रमाणे सर्व प्रार्थना म्हणाव्यात. त्या प्रमाणे सर्व प्रार्थना म्हटल्या. दुपारी जेवण केल्यावर सुटी असल्यामुळे १ तास झोप काढली व पूजेच्या खोलीत जाऊन श्रीसाई-सच्चरित्रातील १८ व १९ अध्याय वाचण्यास घेतले. कारण...निराशेचे ढग जेव्हा मनाच्या आभाळात दाटून येतात. तेव्हा हे दोन्ही अध्याय वाचल्यावर मन निरभ्र होतं !

हेमाडपंतांची रसाळ लेखणी या अध्यायात श्रींचे हृदयच उघडे करून देते. कारण इथेच श्रींनी उपासनेचा सोपा मार्ग दाखवून दिला आहे, व याच अध्यायात हेमाडपंतांची खंत की, श्रींनी त्यांच्यावर इतक्या वर्षांची सेवा करून ही कृपा केली नाही. ही दूर केली आहे. हेमाडपंतांना जेव्हा ही खंत वाटते, त्यावेळी बाबा त्यांना सांगतात की, शामाकडे जाऊन १५ रुपये घेऊन ये.

शामाकडे गेल्यावर शामा त्यांना गुरुमंत्र घेण्यासाठी प्राणांतीक उपोषण करणाऱ्या देशमुखीण बाईची कथा सांगतात. जेव्हा बाबांना शामा बाईनी धरणे धरलेले आहे असे सांगतात त्यावेळी बाबा तिला अत्यंत मधुर अशा शब्दात सांगतात की, 'आई, बारा वर्षे सेवा करूनही मला माझ्या गुरुने मला मंत्र दिला नाही. तेव्हा मी तुला कसा मंत्र देऊ ! माझ्या गुरुने मला फक्त अनन्य नजरेने स्वतःकडे पहाण्यास सांगितले. व दोन पैशांची भिक्षा मागितली. एक पैसा श्रद्धा व दुसरा पैसा सबुरी मी ते दिले. त्यानेच मला ज्ञान झाले, व तूही हेच मला दे. या कथेत हेमाडपंताना बाबांनी त्यांना अनुग्रह दिल्याची खूण पटते. हेमाडपंत बाबांकडे परत येतात. बाबांनी त्यांना विचारल्यावर ते ती गोष्ट सांगतात. बाबा त्यांना खडीसाखर हातात देतात व म्हणतात ही गोष्ट ध्यानात ठेव म्हणजे ह्या साखरेसारखी तुझी स्थिती होईल.

हा अध्याय वाचला आणि डोळे मिटले, अचानक अनाहूत ध्वनि आला की "आज, मी तुला उपदेश दिला हे पटवून देईन." थोडा वेळ घरकाम केल्यावर गॅलरीत आलो व शेजारच्या बिल्डींगमधील आमच्या स्नेह्याच्या गॅलरीकडे नजर वळली. मला एकदम त्यांच्याकडे एक निरोप देण्याची आठवण झाली. चटकन मी

खाली उतरलो. व त्यांच्या घरी आलो. खूप वेळ गप्पा मारल्या घरी जाण्यासाठी निघालो असता माझ्या स्नेह्यानीं मुठीत खडीसाखर दिली व म्हणाले. हा माझ्या गुरुने दिलेला प्रसाद आहे. ती खडीसाखर म्हणजेच श्रींनी मला गुरुपदेश दिला ह्याची पावती होती. म्हणतात ते खोटे नाही की, सद्‌गुरू हे शिष्याला आपल्या-सारखे करतात. कारण सद्‌गुरू हा असा परिस आहे की, तो शिष्याला परिस करतो. माझीहि स्थिती खडीसाखरेसारखी होईल असं बाबांनी पटवून दिलं.

● ● ●

# श्रीसाई जेव्हा आस्तित्वात होते— श्रीसाई जेव्हा हयात नाहीत त्यावेळी ....

—श्री. बिपिन कपीलराव स्वादिया
२०७, कमलकुन्ज, तिसरा माळा,
दत्त मंदिर रोड, संगिता थिएटर समोर,
मालाड (पूर्व) मुंबई—४०००६४

● श्रीसाईबाबा जेव्हा देहरुपात होते तेव्हा ते काही भक्तांना कधीतरी शिव्या देत, किंवा सटका हाती घेऊन त्यांच्या पाठी लागत व मारत देखील. जो साईभक्त श्रीसाईकथेशी सुपरिचित आहेत. त्यांना याप्रकारच्या अनेक कथा माहित असतीलच.

अनेक भक्त ज्यांची श्रद्धा अजून दृढ नाही त्यांच्या मनात अनेकवेळा संशय येतो की, श्रीबाबांसारख्या सिद्ध पुरुषांनी असे शिव्या देणे, भक्तांच्या पाठीमागे धावणे किंवा त्यांना मारणे वगैरे असे प्रकार का करावेत ?

असं म्हणतात की, 'संशयात्मा विनश्यति' श्रीसाईसारख्या श्रेष्ठ संतांच्या संबंधी अशी शंका आपण मनात आणणे देखील अयोग्य होय. आपण जर या सर्व गोष्टींचे विश्लेषण केले तर आपल्याला चटकन स्पष्ट दिसेल की, श्रीबाबा प्रत्येक भक्ताच्या बाबत असे वागत नसत. फक्त, ज्या भक्ताविषयी त्यांना उत्कटतेने वाटे किंवा ज्या भक्तांची श्रींवर दृढ श्रद्धा होती व ज्यांना श्रीबाबा आपले सर्वस्व वाटे अशाच भक्तांबाबत बाबा असे वागत.

श्रीबाबांची आपल्या उत्कट भक्तांवर कृपा करण्याची ही आगळी व वेगळी पद्धत होती. ते सत्पात्र भक्तांच्याबाबत अशी कृपा करत व जे भक्त अपात्र होते

अशा भक्तांच्याबाबत मात्र ते अजिबात असे वागत नसत. अनेक सिद्ध पुरुष व संत असेच आपल्या प्रिय भक्तांशी वागत असत. श्रीरामकृष्ण परमहंस यांचीही पद्धत अशीच होती. ते कधी कधी शिव्या देत तर कधी कधी मारत पण असत. विवेकानंदांच्या बाबतीत घडलेली घटना या संबंधी फार प्रसिद्ध आहे. नरेन्द्रच्या अध्यात्मिक तयारीच्या पूर्णतेची त्यांना खात्री असल्यामुळेच त्यांनी एकदा त्यांच्या छातीवर लाथ मारली आणि त्याचक्षणी नरेंद्राची संपूर्ण कुंडलिनी जागृत झाली. त्यांचा आत्मा प्रकर्षाने असा जागृत झाला की, नरेंद्रांना साक्षात्कार झाला व जगाला विवेकानंदाची ओळख झाली. त्यांची आठवण आजही सर्वजण विसरले नाहीत.

सद्‌गुरुंची अशी कृपा फक्त सत्पात्र भक्तांवर होत असे, व अशाच भक्तांच्या पाठी सटका घेऊन पळत असत. कारण अशा भक्तांमध्ये कुंडलिनी जागृतिची जास्त शक्यता असे, व त्यामुळे श्रींच्या थोड्याशा प्रयत्नांनी भक्त अत्यंत उच्च अवस्थेत जात असत.

उदाहरणादाखल सांगायचे म्हणजे थंडगार पाण्याची वाफ होण्याची अजिबात शक्यता नाही. पण जर पाणी उष्ण असेल व उकळत असेल तर त्याची वाफ होण्याची शक्यता जास्त. कारण ते थोडे अधिक उकळले की त्याचे वाफेत रूपांतर होते. अशाच प्रमाणे जर भक्ताचा आध्यात्मिक विकास पुरेसा झालेला असेल व तो सत्पात्र असेल तर त्याला थोडा धक्का सुद्धा सर्वोच्च अनुभव देऊ शकेल, व हा धक्का म्हणजेच सद्‌गुरुंची शिवी किंवा मार होय.

म्हणूनच बाबांचे भक्तांना शिवीगाळ देणे, त्यांना मारणे हे त्यांचा विक्षिप्त मनोवृत्तिचे प्रदर्शन नसून उलट हे त्यांच्या अंतिम कृपेचे व भक्तांविषयी त्यांना वाटत असलेल्या कळकळीचे द्योतक होते, व भक्तांच्या आध्यात्मिक उन्नतीची श्रींना पूर्ण कल्पना असल्यामुळे त्यांना माहित होते की कोणत्या भक्तावर कशी कृपा करावी.

सद्‌गुरू म्हणजे मूर्तिमंत प्रेमगंगा ! ते निष्कारण कुणाच्या पाठी का बरे धावतील कोणाला उगाचच का बरं शिव्या देतील ? उलट श्रींना फक्त एकच चिंता होती, त्यांचा एकच हेतू होता तो म्हणजे आपल्या भक्तांचा अहंकार कोणत्या ना कोणत्या प्रकारे नष्ट व्हावा.

आमच्या आध्यात्मिक प्रगति पथावर जर सर्वात मोठं विघ्न जर कोणतं येत असेल तर ते आपल्या अहंकाराचं ! आमच्या सर्व बहिर्मुख कृतिंच जर बारकाईने निरीक्षण केलं तर आपल्याला आढळेल की या सर्व कृतिंचा मध्य बिंदू हा अहंकारच आहे. आमच्या आशा, आकांक्षा ह्या कधीही पूर्ण न होणाऱ्या असतात. कारण आम्ही आपला अहंकार कधीच घालवू शकत नाही, व त्यामुळे आमच्या सर्व बहिर्मुख धडपडींना मात्र दुःखाची कडू फळ मिळतात. आमच्या वैयक्तिक महत्वाकांक्षाच्या पूर्तिसाठी आम्ही इतरांची खुशामत करतो. खरी गोष्ट ही आहे की; या

सर्व धडपडीमुळे आम्ही जरी थोडेसे यशस्वी झालो तरी कोणत्याहि क्षणी आमच्या मार्गात दुसरी व्यक्ति येते, व कधी कधी तर या प्रवासात आपण आपल्या खऱ्या ध्येयापासून त्यामुळे दूर जातो. कारण महत्वाकांक्षा जसजशी पुरी होत जाते तसतशी ती माणसाचा अहंकार वाढवत जाते, व अहंकारी माणसाला ईश्वराजवळ कसे बर जाता येईल ? शेवटी असे होते की, साक्षात मृत्यु जेव्हा समोर येतो तेव्हा डोळे उघडतात की, "अरे, आपण फार चुकीच्या रस्त्याने जीवन प्रवास केला" पण तेव्हा मात्र वेळ टळून गेलेली असते. कारण आता या ज्ञानाचा आपल्याला स्वतः काहीच लाभ होत नाही.

असा माणूस शेवटीं अशांत, अतृप्त व असमाधानी अवस्थेत जगाचा निरोप घेतो म्हणूनच आपण अंतर्मुख झाले पाहिजे. स्वतःच्या आत डोकावले पाहिजे. मगच आम्हाला अक्षय आनंद मिळेल, व आत्म्याचे परमात्म्याशी मिलन होईल या अंतर्मुख सफरीचा मार्गदर्शक सद्‌गुरू असतो. सद्‌गुरू आमच्या डोंगराएवढ्या अहंकाराचे चूर्ण करतो. अहंकाराच्या झोळीत श्रीसाईबाबा काही टाकू शकत नाहीत. पण तीच झोळी जर अहंकार रहित रिकामी असेल तर श्री ती झोळी आपल्या कृपाप्रसादाने भरून टाकीत हा अनुभव श्री हयात असताना अनेकांनी घेतला आहे. जे सत्पात्र भक्त होते त्यांनी श्रींच्या अनुग्रहाचा अमृतानुभव घेतला होता.

सध्या बाबा हे देहरूपात नाहीत. पण म्हणूनच प्रश्न निर्माण होतो की, खरोखरच ते आपल्यात नाहीत का ? उलट आम्हा सर्वांना पदोपदी त्यांच्या आपल्या वरील कृपेचा अजुनही अनुभव येतो. आजही आपल्या सारख्या हजारो भक्तांना श्री त्यांच्या मूर्तिद्वारे, फोटो द्वारे बोलतात, मार्गदर्शन करतात असं मनःपूर्वक खात्रीने वाटतं त्यांना वाटत की आपल्या घरी कोणी आपलं हित पहाणारी आपलं भलं करणारी व्यक्ति आहे. जसा आपल्या घरी आपल्याला आपले आई, वडील, काका, आजोबा, आजी अशा वृद्ध व्यक्ति असताना आधार वाटतो तसाच आधार श्रींचा फोटो किंवा मूर्ति घरी असताना वाटतो. श्रींच्या कोणत्याही स्वरूपाची प्रतिक आंगठी लॉकेटस यांच्यामुळे आम्हाला सुरक्षितता वाटते. आर्द्र स्नेह, गाढ प्रेम किंवा सहानुभूति जशी आपल्याला आपल्या जवळच्या नातेवाईकांमुळे वाटते तोच अनुभव आपल्याला श्रींच्या घरातील अस्तित्वामुळे येतो. असं वाटत की आपल्या शिरावर कोणत तरी कृपाछत्र आहे. ज्यामुळे आपलं पदोपदी संरक्षण होत आहे, व हाच अदृश्य हात आपल्याला योग्य मार्ग दाखवून आपल्याला चुकीच्या मार्गापासून परावृत्त करतो. असं वारंवार वाटत राहतं.

ज्याप्रमाणे गरोदर स्त्रीला आपल्या गर्भाचं अदृश्य असूनसुद्धा पदोपदी अस्तित्व जाणवतं व ती जशी त्याची काळजी घेते त्याप्रमाणे श्रीबाबा आपल्याला त्यांच्या आपल्यावरील कृपेच्या पाखराची अप्रत्यक्षपणे जाणीव करून देतात, व त्यामुळे आम्हांला अतिशय आनंद व समाधान मिळते.

माझं वैयक्तिक पण ठाम मत आहे कीं, श्रीबाबा जेव्हा अस्तिवात होते व कृपा करीत होते त्याच्या कितीतरी पट वर्षाव आता ते करीत आहेत. कारण त्यावेळच्या भक्त गणांपेक्षा किती तरी पट भक्त आता आहेत, व आता श्रींच्या अव्यक्त रुपाचा व कृपेचा पण विस्तार तेवढाच अधिक झाला आहे. येणाऱ्या अनेक वर्षांत हे अव्यक्त रूप व कृपा जगडव्याळ होईल. अशा सद्‌गुरुंशी आपलं नातं जोडणं ही खरोखरच परमभाग्याची गोष्ट होय. हे नातं जन्मोजन्मींचं आहे व तसंच राहील.

☆ ☆ ☆

# दोन घटना

—श्री. अनिल पंडित, इन्दूर

● घटना १९७९ च्या जुलै महिन्याची आहे. त्या महिन्यात श्रीगुरुपौर्णिमा होती. मनात अतिशय इच्छा होती की, गुरुपौर्णिमेला श्रीसाईसच्चरित्राची सुरवात करावी. गुरुपौर्णिमेसारखा दिवस मग काय विचारायचे. पण ही इच्छा पूर्ण होणार कशी, कारण नोकरी पडली फिरतीची. फिरतीचा कार्यक्रम पाहिला. गुरुपौर्णिमेलाच ग्वाल्हेरला जायचे होते. मन फारच उदास झाले. पण लगेच मनाने म्हटले की, बाबांजवळ आपल्या अडचणी व इच्छा सांगितल्या तर शक्यतो पावेतो त्या पूर्ण होतातच, ह्यात काही शंका नाही.

मी बाबांच्या फोटो समोर हाथ जोडून विनंती केली की, हे प्रभो साई तुम्हीच म्हणता की, पोथीची सुरवात करण्याकरिता रामनवमी, गुरुपौर्णिमा व पुण्य तीथी सारखे दिवस नाही. रामनवमी तर होऊन गेली, पुण्यतिथीला तर अजून बराच वेळ आहे. गुरुपौर्णिमा ह्याच महिन्यात आहे. का नाही ह्या संधीचा फायदा घ्यावा व पुण्य पदरात पाडावे.

बाबा तुम्हीच तर म्हणता की, भक्ताची इच्छा पूर्ण करणे माझे जणू ब्रीदच आहे. जया मनी जैसा भाव तया तैसाच अनुभव, मग ती बाबांची पोथी असो, रामायण असो, श्रीगजानन महाराजांचे चरित्र असो की, गुरुचरित्राचे पारायण असो. बाबा सांगतात की, सर्वांचा मालिक एक; म्हणजेच श्री साईबाबा.

माझ्यासाई भक्तांनो गुरुपौर्णिमेच्या आदल्या दिवशी मला कंपनीकडून तार आली की, सध्यातरी ग्वाल्हेरला जाण्याचे रद्द करावे, व इन्दूरलाच काम करावे.

हे साईबाबा अगाध तुझे चरित्र व विचित्र तुझी लीला. साईभक्तांना कल्पना येईलच की ती तार वाचून माझ्या मनाची काय स्थिती झाली असेल. माझा आनंद गगनात मावेनासा झाला.

हा नटनाटकी साई सर्वत्र भरलेला आहे. गुरुपौर्णिमेच्या दिवशीच मी ठरल्या प्रमाणे बाबांच्या पोथीची सुरुवात केली.

माझी फिरतीची नौकरी असल्यामुळे मला कोणत्या पोथीचे पारायण जमत नाही. पण शांती समाधाना करिता व हा भवसागर तरुन जाण्यासाठी जेव्हा जेव्हा मला वेळ मिळतो मी कोणत्या न कोणत्या पोथीचे वाचन करीत असतो.

श्रीसाईबाबांच्या चरणी हीच प्रार्थना आहे की, हे श्रीसाई माझ्या भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्यास मागेपुढे पाहू नकोस, व असाच संकटाच्यावेळी भक्तांसाठी धाऊन ये.

१९६९ साली बाबांनी आणखी दोन गोष्टीने थक्क करून सोडले. दत्तजयंतीच्या सप्ताहामध्ये मला एका रात्री असे स्वप्न पडले की, मी दिगंबरा-दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबराचा जप करित आहे व जप संपता क्षणी मला बाबांची मूर्ती दिसली. अर्थात बाबांनी श्रीदत्त असल्याची साक्ष दिली.

दुसरी घटना नुकतीच घडली आहे. सहावे लेखक-कवी स्नेह संमेलनाची जाहिरात श्रीसाईलीला मासिकातून प्रसिद्ध झाली. मला फार आनंद झाला. कारण ह्या संमेलना निमित्त बाबांच्या समाधीचे दर्शन होणार व सर्व लेखक कवींची भेट होणार.

माझ्या वडिलांनी व मी ठरविले की काही झाले तरी ह्यावर्षी संमेलनाला जायचेच त्याप्रमाणे संस्थानशी पत्र व्यवहार केल्यावर अम्हाला त्यांचे निमंत्रण पण आले.

बाबांच्या मनात काहीं औरचं होते. मला प्रेरणा मिळाली की, माझ्यापेक्षा वडिलांनी आईला न्यावे. त्याप्रमाणे वडिलांनी आईला शिर्डीला नेले. आईला पण ह्या निमित्याने संमेलनाचा सर्व सोहळा पाहण्यास मिळाला.

संमेलन ९ व १० फेब्रुवारीला होते, इकडे मला महाशिवरात्रीच्या दिवशी म्हणजे १४ फेब्रुवारीला रात्री एक स्वप्न पडले त्यात मला एक मोठे शिवलींग दिसले व जवळच बाबांची शिर्डीतील मूर्ती, मूर्तीला प्रदक्षणा घातल्या व समाधीवर डोके ठेवले व बाबांना म्हटले की, बाबा सांभाळून घ्या. नंतर माझी झोप उघडली.

साईभक्तांनो, साईमाऊलीने मला अपूर्व साईलीलामृताने तृप्त केले व मला संमेलनाला जाता न आल्याने माझ्या निराश झालेल्या मनाला आनंदाने व समाधानाने भरुन काढले.

आपल्या भक्तांच्या इच्छा, आकांक्षा पूर्ण करण्यास ही साईमाऊली मागे पुढे पाहत नाही अशी आहे माझी ही साई आई.

☆ ☆ ☆

# शिरडी-वृत्त माहे जुलै सन १९८०

मे महिन्यात शाळा कॉलेजांच्या सुटीमुळे साईभक्तांची प्रचंड गर्दी होती. संपूर्ण महिना यात्रेच्या स्वरुपात गेला. काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणेः—

**कीर्तनः**—संस्थान गवई काव्यतिर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमींप्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

**प्रवचनः**—१) ह. भ. प. मेघश्याम वा. रानडे मडगाव गोवा याचे प्रवचन झाले.

२) पं. उत्सवलाल शर्मा उज्जैन यांचे प्रवचन झाले.

**भजन, गायन वादन वगैरे** १) श्री. बाळकृष्ण दा. बिडवे, पुणे.

२) श्री. आदीनाथ तु. भुइंगळ, सावळी विहीर.

३) श्री. शिवाजी तु. धुमाळ, शिरडी.

४) सौ. कौसल्याबाई च. चोपडा, शिरडी. ५) श्री. श्रीधर ना. कुलकर्णी, मुंबई. ६) सौ. ज्योती ऐं. मनुजा, ७) श्री. ऐंशीराम मो. मनुजा, ८) कु. मीना मनुजा ९) श्री. चांद मनुजा, १०) श्री. महेश मनुजा मुंबई. ११) श्री. मधुकर सोजवळ, १२) श्री. सुरेश सोजवळ, १३) श्री. नंदकुमार पाठक १४) श्री. कोंडीराम पडवळ, १५) श्री. चंद्रकांत साळूंके, साखर वाडी, कोपरगाव. १६) श्रीमती विमलबाई भा. शिर्के जळगाव. १७) श्री. मनोहर वि. परख मुंबई. १८) कु. विभावरी अंतरकर वसई. १९) श्री. विठ्ठलराव ह. उलहे, अमरावती.

**हवापाणीः**—शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. मे महिन्यात कडक उन्हाळा असूनही पाण्याची टंचाई भासली नाही.

☆ ☆ ☆

# गुरुपौर्णीमा

आली आली गुरुपौर्णिमा करू या सद्‌गुरु पूजा
जमूनी शिरडीला करू या साईनाथ पूजा ॥ १ ॥

गुरु भेटीला मन आतुरले आतुरले
चिंतनात ते तन मन रंगूनी गेले ॥ २ ॥

आनंदाचा दिन हा सद्‌गुरुची होता भेटी
षड्‌रिपूंची झालेली ताटा तूटी ॥ ३ ॥

लाविल्या समया चमकती हे दिवे
आजू बाजूला तेवती ही निरांजने ॥ ४ ॥

उदबत्तीचा सुवास सुटला
भक्त गणांचा आनंद उसळूनी आला ॥ ५ ॥

बोल उठले तूच सद्‌गुरु
तूच तारु हाच आमचा निर्धारू ॥ ६ ॥

घेऊनी हाती पंचारती बंधू भगिनी ओवाळती
सद्‌गुरु साईनाथ हासती नयनांत चमके प्रीती ॥ ७ ॥

तेज ओसंडे दाही दिशा
सर्वांच्या परिपूर्ण झाल्या मनीषा ॥ ८ ॥

स्वत्वच अर्पूनी रमूनी गेले साई भजनी
रंगुनी गेले सारे गुरुभजनी गुरुपूजनी ॥ ९ ॥

पाहूनी डोळा हा गोड सोहळा
सुमनच्या जिवाचे भान हरपले ॥ १० ॥

—डॉ. सुमन खानवीलकर
सीताकुंज, लोणावळा.

# काय केले साईबाबा....

काय केले साईबाबा वेड लाविले जगाला
काशी प्रयागाचे आज स्थान मिळे शिरडीला !

काय जमतो हा मेळा काय होती भक्त गोळा
किती सोहळा आगळा तुझ्या स्नान आरतीला
भक्ति रसात न्हाऊन लावी भाळ समाधीला १

नाही अशांती गोंधळ सकाळची शांत वेळ
दुपारही सायंकाळ धरतात एक मेळ !
केवढा हा अधिकार बाबा तुम्ही मेळवीला ! २

पुष्पहार मोठे मोठे पेढे पुडे मोठे मोठे
पुष्पहार छोटे छोटे फुटाण्याचे पुडे छोटे !
किती येती पायापाशी सीमा नाहीच कशाला ! ३

समाधीत आहे तेज आहे मूर्तीमध्ये ओज
देवा तुझ्या शिरावरी सोने मौक्तिकांचा ताज !
रंजल्या गांजल्यासाठी आहे पोटात उमाळा ! ४

नाही वैभवाचा मोह सर्वविश्व तुझे गेह
दूर देवा घालविशी पीडितांचा नित्य दाह !
सगुण निर्गुण दोघा लाविला भक्तीचा लळा ! ५

—प्रि. श्री. तु. नाईक एम्. ए.
११ हेलिमा मंझील, गुप्ते पथ,
विष्णुनगर डोंबिवली (प.)

# देवकीनंदन गोपाला तू—

देवकीनंदन गोपाला तू रमापतिच्या अवतारू
श्री गुरुराज गुरु, जय जय साईनाथ सद्‌गुरु ॥ धृ० ॥
राम नाम तू, घनःश्याम तू
तू शीव-ब्रह्मा श्री विष्णू तू
श्री दत्तात्र्येय, नवनाथाश्रय, त्यैलोक्याचा कल्पतरू
श्री गुरुराज गुरु जय जय साईनाथ सद्‌गुरु ॥ १ ॥
हे जगदिशा, द्वारकाधिशा
आतुरलो मी तव आशिषा
मायबाप तू सखा सोबती, तुझेच मी लेकरू
श्रीगुरुराज गुरु जय जय साईनाथ सद्‌गुरु ॥ २ ॥
चिरसौख्याची तूचि ग्वाही
युगा युगाची तु भरपाई
नमवितो माथा, चरणी आता, नकोस दूर सरू
श्रीगुरुराज गुरू जय जय साईनाथ सद्‌गुरु ॥ ३ ॥

—श्री. मधु खोकले
वार्ताहर नागपूर पत्रिका मूर्तिजापूर, जि. अकोला (४४४१०७)

# साईचरणी जीव माझा जडला

गुरुपौर्णिमेचा आज दिन आला
चला जाऊ साई दर्शनाला
संतराणा साई माझा झाला
साईचरणी जीव माझा जडला
भक्ति भावाचा तो सोहळा
डोळे भरुनी मी पाहिला
पाहूनी बाबांच्या दिव्य लीला
साईचरणी जीव माझा जडला
तू अनंत रुपे घेऊनी उरला
प्रपंचातूनी परमार्थ शिकवीला
भक्तिची पुष्पे वाहतो तुजला
साई चरणी जीव माझा जडला

—श्री. रमाकांत पंडित
प्रभास्मृती, भाऊदाजी रोड, माटुंगा, मुंबई १९

# सोडी मायेचा पिंजरा

साईचा मिळविण्या आसरा
सोडी मायेचा पिंजरा ॥धृ०॥

श्रद्धेविण फळ ना मिळते
तूज कळते परी ना वळते
भक्तीने शरण जा ईश्वरा
सोडी मायेचा पिंजरा ॥१॥

तूज भवती फिरते दुनीया
जरी असेल पदरी माया
किती कष्ट सोशिले पामरा
सोडी मायेचा पिंजरा ॥२॥

तूज बुद्धी दिली देवाने
करी किर्तन आनंदाने
घे नाम मिळविण्या आसरा
सोडी मायेचा पिंजरा ॥३॥

माय बाप बंधु भगिनी
सुत कन्या अन् सहचारिणी
घे मिळवूनि त्यांसी आसरा
सोडी मायेचा पिंजरा ॥४॥

उरलेल्या अयुर्षी कर रे
सांई सांई नाम जप घेरे
हे अमृत लावी अधरा
सोडी मायेचा पिंजरा ॥५॥

—सौ. रेखा तासकर
जोशी ब्लॉक, पिंपरी-वाघेरे
पिंपरी, पुणे-१७

# श्री साईनाथाची आरती

जयदेवा साईनाथा ! । धाव येई भगवंता ।
कृपा करी दीनानाथा ! चरणी ठेवितो मी माथा ॥
जय देवा साईनाथा ॥ ध्रु० ॥

१

साईनाथा ! नाम तुझे, भक्ति-मुक्तिचे धाम ।
अंतरंगी रोमरोमी, तुच्च माझा घनःशाम ।
जय देवा साईनाथा ॥

२

सत्य, शांती, प्रेम, धर्म, हेचि जीवनाचे वर्म ।
हेचि असे पुण्य कर्म, हेचि धर्माचे मर्म ।
जय देवा साईनाथा ॥

३

प्रभो ! तुझा अवतार, दीन तारावयासी ।
दीनानाथ ! देवरूपा !!, आत्मानंदा ! अविनाशी !
जय देवा साईनाथा ।

४

पतित मी ! पापराशी !!, आलो तव चरणाशी ।
मुक्त करी भव पाशी, ठाव देई चरणाशी ।
जय देवा साईनाथा ॥

—श्री. गं. म. जाधव
E. W. S. क्वार्टर्स क्रमांक-६०,
खुजीनगर, नागपुर ९

☆